सिंहनादें । शंख वाजवी आनंदें ॥ ३ ॥ पूर्णप्रतापाचें अंग । तुका ह्मणे संतसंग ॥ ४ ॥

॥ ७२४७ ॥ तेव्हां एक वेळा सारी । शंखध्वनीची कूसरी ॥ १॥ भेरी गर्जती ठोकिल्या । पणवान कांहीं गाजल्या ॥ २ ॥ एकसरेंचि गोमुखें । दाही दिशा नादमुखें ॥ ३ ॥ झाल्या पूर्ण ह्मणे तुका । लीला पांडवांची ऐका ॥ ४ ॥

॥ ७२४८ ॥ थोरी थोरका तो रथी । शुभ्रवर्ण हयनाथी ॥ १ ॥ दोघे युक्त रहंवरीं । कुंतीपुत्र पूतनारी ॥ २ ॥ दिव्य वाजाविते झाले । शंख करींचे आपुले ॥ ३ ॥ अहो माधवीं पांडव । तुका ह्मणे ठेवी जीव ॥ ४ ॥

॥ ७२४९ ॥ पांचजन्य हृषीकेशें । वाजवितांची आवेशें ॥ १ ॥ देवदत्त धनंजयें । वाजाविला देऊं भयें ॥ २ ॥ पौंड्रनामा महाशंख । श्रवणें रिपुसीं दे दुःख ॥ ३ ॥ भीमें वाजाविला बळें । तुका वदे हर्ष मेळें ॥ ४ ॥

॥ ७२५० ॥ प्रभु अनंत विजय । श्रवणार्थी दाता जय ॥ १ ॥ शंखालागीं युधिष्ठिर । वाजावित हर्षपर ॥ २ ॥ आतां नकुलसहदेवें । शंख वाजवी ऐकावे ॥ ३ ॥ सुघोष मणिपुष्पक । तुका ह्मणे हे रसिक ॥ ४ ॥

॥ ७२५१ ॥ धनुर्धर महा काश्य । राजे जाशीं सर्व वश्य ॥ १ ॥ तैसा भीष्मप्राण हारी । शिखंडिची केवढी थोरी ॥ २ ॥ धृष्टद्युम्न उत्तरपिता । सात्यकी तो अपराजिता ॥ ३ ॥ तुका पुढें विनवीतो । ऐका व्यास ज्या वाणितो ॥ ४ ॥

॥ ७२५२ ॥ जनक द्रौपदीचा ऐका । ज्याच्या नामें यमा धोंका ॥ १ ॥ पांची पांडवांचीं मुलें । माजी अभिमन्यु दादुलें ॥ २ ॥ अन्यत्रही देशपती । मिळूनि जळज वाजाविती ॥ ३ ॥ आपुलाले पृथकाकारें । तुका ह्मणे एकसरें ॥ ४ ॥

॥ ७२५३ ॥ तो घोष धार्त्तराष्ट्रांचें । करी छेदन धैर्याचें ॥ १ ॥ विदारित वक्षस्थळा । दिल्ही सर्वांशी अवकळा ॥ २ ॥ गगन आणि भूमी । झालीं नादें करुनी श्रमी ॥ ३ ॥ तुका ह्मणे सैन्य थोवी । महा तुंबळ गर्जवी ॥ ४ ॥

॥ ७२५४ ॥ आप्त व्यवस्थित सारे । पाहोनि स्वचमु कैवारे ॥ १ ॥ धार्त्तराष्ट्र कपिध्वज । घेऊं पाहे युद्धा आज ॥ २ ॥ उचलुनी धनु करीं ।

हांसे कौतुकें अंतरीं ॥ ३ ॥ आरंभावी खणाखणी । तुका ह्मणे त्या निर्वाणीं ॥ ४ ॥

॥ ७२५५ ॥ तेव्हां पार्थ हृषीकेशा । बोले कैसा हांसोनी ॥ १ ॥ मध्य भागीं नेई रथ । मनोरथ पुरवी ॥ २ ॥ उभय सैन्य पाहेन मी । ऐशा भूमी करी उभा ॥ ३ ॥ अच्युत ह्मणे बैसुनि पाहे । तुकया सोय दिसे बा ॥ ४ ॥

॥ ७२५६ ॥ तों कीं जों यां समीपाहे । मन संदेह वाराया ॥ १ ॥ झुंझार जे उभे रथी । मोक्ष ग्रंथी बांधाया ॥ २ ॥ आह्मी तरीं कोण कोणा । नारायणा भांडावें ॥ तुका ह्मणे ऐसें देवा । अर्जुन तेव्हां बोलिला ॥ ४ ॥

॥ ७२५७ ॥ पाहेन मी युद्धीं वीर । वीर धीर प्रतापी ॥ १ ॥ मिळुनि आले आप्तवर्ग । किंवा स्वर्ग साक्षेपी ॥ २ ॥ मज भासते दुर्बुद्धी । नाहीं शुद्धी चोखट ॥३॥ तुका ह्मणे पार्थ जीवा । लागीं देवा खटपट ॥४॥

॥ ७२५८ ॥ हृषीकेशा गुडाकेश । बोले ऐसें प्रार्थुनी ॥ १ ॥ भारत राया संजय बोले । प्रेमें डोले अंतरीं ॥ २ ॥ त्या दों सैन्या मध्यभागीं । रथ शारंगी करी उभा ॥ ३ ॥ तुका ह्मणे विजयी रथ । विजयी पार्थ सांभाळी ॥ ४ ॥

॥ ७२५९ ॥ समोर भीष्मद्रोणाच्या । भूपाळाच्या सन्मुख ॥ १ ॥ पार्थ पाहे ह्मणे यातें । मिळाले ते कुरूप्रति ॥ २ ॥ तेव्हां विभो कृष्णामनीं विचार ध्यानीं आणिला ॥ ३ ॥ कांहीं कौतुक दिसताहे । तुकया साह्य दिनबंधु ॥ ४ ॥

॥ ७२६० ॥ तो पार्थ पाहे चुलते । क्रोधें पिते खवळले ॥ १ ॥ आजे त्यांत तयां प्रती । नाहीं क्षितीं उपमा ॥ २ ॥ गुरु मामे आणि भाऊ । आपुले जीऊ प्रत्यक्ष ॥ ३ ॥ पुत्रपौत्र तयांसही । तुका पाही त्या पाठीं ॥ ४ ॥

॥ ७२६१ ॥ सासरे सोयरे तेही । निःसंदेही जे उभे ॥ १ ॥ त्या दोंहीं फौजे आंत । युद्ध ख्यात लावीते ॥ २ ॥ कौंतेयें देखोनियां । जीवीं माया झळंबे ॥ ३ ॥ बंधूतें ही रणांगणीं । तुका वाणी ज्या लागीं ॥ ४ ॥

॥ ७२६२ ॥ कृपेकरुनी आविष्ट । परनिष्ठ भावार्थी ॥ १ ॥ ऐसा विषादें बोलिला । कृष्णा भला प्रार्थित ॥ २ ॥ देखियेलें स्वजनास । आपणास जे वंद्य ॥ ३ ॥ युद्धार्थी ते उभे सिद्ध । जे निषिद्ध तुकयाशी ॥ ४ ॥

॥ ७२६३ ॥ पिळिति सर्व ही गात्रें । कळा वक्रें त्या काळीं ॥ १ ॥ शरीरीं सुटतो कांप । रोमरोम कांपती ॥ २ ॥ तुका विनवी नारायणा । क्लेश मना पार्थाच्या ॥ ३ ॥

॥ ७२६४ ॥ हातापासूनि गांडीव । गळतें जवि दग्धला ॥ १ ॥ उभा राहों ही न शके । चित्त शोकें भ्रमिष्ट ॥ २ ॥ तुका ह्मणे करुणा निधी । हे उपाधी नीवारा ॥ ३ ॥

॥ ७२६५ ॥ देखतों मी निमित्तांस । विपरीतांस केशवा ॥ १ ॥ न कल्याण ही मी देखें । युद्धीं सखे मारुनी ॥ २ ॥ तुका ह्मणे जैसें भयें । तैसें स्वयें निवेदी ॥ ३ ॥

॥ ७२६६ ॥ न इच्छी मन माझें । कांहीं राज्यादिक वोझें ॥ जय कांक्षे विशीं तुझे । पाय दिव्य आहेती ॥ १ ॥ कृष्णा गोपाळा माधवा । नित्य प्राणाचा विसांवा ॥ आह्मा कासयासी व्हावा । हा संसार पातकी ॥ २ ॥ राज्यभोगें जीवित हें । या सुखाचा संदेहे ॥ आतां माझी पाहे । लाज रक्षी दयाळा ॥ ३ ॥ गोविंदा काय आमुतें । चाळवणी वोपा भातें ॥ तुका दास कुशब्दातें । त्रास मानी वोखटीया ॥ ४ ॥

॥ ७२६७ ॥ राज्य भोगूं सुखें आह्मीं । काय दिसतें दुर्नामीं ॥ तूं तंव काय नेणे स्वामी । जें प्रार्थावें हळुहळु ॥ १ ॥ अपेक्षितों ज्या निमित्त । तें तंव वाव झालें सत्य ॥ पदरीं माप हें असत्य । आज घाली रोकडें ॥ २ ॥ सोडोनि ते प्राणधना । आणि संसारीं वासना ॥ आणि कल्पना कामना । मेली काय ममतेची ॥ ३ ॥ उभे युद्धांत राहिले । निःसंदेही वीर भले ॥ यांत सुख चालुनि आलें । तुका ह्मणे कोणतें ॥ ४ ॥

॥ ७२६८ ॥ गुरु पाहे श्रेष्ठ मातें । द्रोण नामें जो आमुतें ॥ तैसें भीष्माचेंही नातें । काय आजी बुडालें ॥ १ ॥ तात बापाचा जो आजा । चुलते पाहे अधोक्षजा ॥ कितीं पुत्र महाराजा । मरों आजी टेंकले ॥ २ ॥ माय बंधु तोची मामा । सासऱ्याची हे प्रतिमा ॥ लेंक पुत्राचे जी आह्मा । अंगें दीसे मारणें ॥ ३ ॥ स्त्रीचे भाऊ हे शालक । तैसे सोयरे आणिक ॥ तुका ह्मणे जी कौतुक । वाटे मज देखोनी ॥ ४ ॥

॥ ७२६९ ॥ मी यांसि हो जनार्दना । सहसा मारूं इच्छी ना ॥ नसे दुष्ट वासना । जन्मपणापासूनी ॥ १ ॥ हें जरीं एकवेळे । मज मारितील बळें ॥ तें मी न मनीं वोळें । ऐसा हेत उदास ॥ २ ॥ स्वर्गलोक मृत्यु लोक ॥

पाताळिचे निवासक ॥ झालों हीन आह्मी रंक । तेंच सुख आवडे ॥ ३ ॥ तेथें भूमि हे थोडकी । किती ईचा हो पाड कीं ॥ तुका वदेल द्वाडकीं । लोकीं ऐसें दिसेना ॥ ४ ॥

॥ ७२७० ॥ वधोनि हे धार्तराष्ट्र । राया धृतराष्ट्राचे पुत्र ॥ जनार्दना सिद्धि सूत्र । काय दीसे मी नेणें ॥ १ ॥ आप्तालागुनी पाहतां । पाप वांटाची आईता ॥ भला नेमिला अनंता । लोकांमाजी निंद्य जो ॥ २ ॥ आततांई ही करून । आलों मारुनि स्वजन ॥ तुका वदेल भजन । कोण्या तोंडें अयकुं मी ॥ ३ ॥

॥ ७२७१ ॥ या लागीं जगत्पती । यांसी मारावया चित्तीं ॥ वाढविली उपपत्ती । ते उगीच सुनाट ॥ १ ॥ आह्मी पांडव लोकीं मान्य । कर्म नाचरों अमान्य ॥ योग्य न हों हें पैशुन्य । अंगीं आंतलों घ्यावया ॥ २ ॥ होऊं स्वजन हत्येनें । सुखी माधवा कैसेने ॥ तुका ह्मणे श्रीकृपेनें । उणें आह्मा काय जी ॥ ३ ॥

॥ ७२७२ ॥ ते हे जरीं न पाहती । सारासार न्याय नीती ॥ दृष्टी अंध लोभें होती । वश वर्त्ती कामाच्या ॥ १ ॥ आशा लागली द्रव्याची । अथवा पुत्र संततीची ॥ तेथें सहज विवेकाची । मानमोड होतसे ॥ २ ॥ कुळ हत्येंत जो दोष । मित्र द्रोहाचा विशेष ॥ तुका ह्मणे हो हें विष । दुष्ट घाली हो अन्नांत ॥ ३ ॥

॥ ७२७३ ॥ ज्याच्या भेणें साधक नरीं । लंघनें साधनें डोंगरीं ॥ जातें पाहतां कंसारी । तूं हातींचा सूटसी ॥ १ ॥ तया पातकापासोनी । सुटों आह्मी कैसेनी ॥ निंद्य कर्म आचरोनी । वंद्य होऊं तो कैसें ॥ २ ॥ जनार्दना विष खातां । कैचें अमरत्व आतां ॥ जाणत व्याघ्रजाळीं जातां । आतां भला कैसेनी ॥ ३ ॥ तैसे कुळहत्येमाजी । दोषें पुण्य लोपे भाजी ॥ तुका कैसें विनवाजी । हें देखतां प्रत्यक्ष ॥ ४ ॥

॥ ७२७४ ॥ कुलक्षयेंच बुडती । सत्य जाणतां श्रीपती ॥ मग त्या वृद्धि होती । अधर्माच्या अनंता ॥ १ ॥ कुळधर्म परंपरा । केला विधीनें संसारा ॥ त्याचा सहज मातेरा । हातें आमुच्या होतसे ॥ २ ॥ धर्मनाशें सर्वकुळ । वश्य अधर्मा सकळ ॥ देखत अन्यायाचें फळ । लांचिव न्याय होतसे ॥ ३ ॥ तुका ह्मणे पार्थ शब्दीं । देवा लागली समाधी ॥ तेणें वचनें हीं कधीं । पैं गा नव्हतीं ऐकिलीं ॥ ४ ॥

॥ ७२७५ ॥ देवा न बोले चि कांहीं । तेणें भ्याला तो हृदयीं ॥ काय महाराजाठायीं । विचार जो येईल ॥ १ ॥ आह्मी जरीं न बोलावें । तरी वहावतों भवें ॥ कोण्ही न काढो स्वभावें । आह्मा टाहो फोडणें ॥ २ ॥ मग विनवी फाल्गुन । अधर्माच्या बळें जाण ॥ दुष्ट कुलस्त्रिया पूर्ण । होती याचा अनुभव ॥ ३ ॥ त्याचा दोष यादव राजा । होती वर्णसंकर प्रजा । तुका ह्मणे बीजा । पासूनी ते अंकुर ॥ ४ ॥

॥ ७२७६ ॥ त्या संकरें नरक । प्रकारें अनेक ॥ होती हा विवेक । सर्वां ठावा ॥ १ ॥ कुळघ्नांच्या कुळा । लागे दोष ज्वाळा ॥ मग तो उन्हाळा । खडखडीत ॥ २ ॥ पिंडोदक क्रिया । लोपें देवराया ॥ बोरुंबरी वांयां जाय जैसी ॥ ३ ॥ तुका ह्मणे सर्व । पूर्वजांसी च्यव ॥ जळीं भंगे नाव । कोण तारी ॥ ४ ॥

॥ ७२७७ ॥ त्या दोषें सां मग कुलघ्नांचे खग । उडवितां अंग टिकोंनेदी ॥ १ ॥ सर्व संकरसे अनंता होतसे । माजी कां न दीसे सार्थक जी ॥ २ ॥ बुडे जाति धर्म कुळ वर्ण आश्रम । नुरे जेथें नाम आचाराचें ॥ ३ ॥ कुळधर्म खरे सांगों मी कीतीरे । तुका ह्मणे सारे खरे बुडती ॥ ४ ॥

॥ ७२७८ ॥ गेले ज्याचे धर्म । अधर्म हे शेष ॥ काय त्या विशेष । धर्म सांगूं ॥ १ ॥ मनुष्याचें हित । जनार्दनास्थित ॥ होतें विष्कळीत । पापयोगें ॥ २ ॥ नरकीं निश्चय । वास त्याचा होय ॥ उद्धार न जाय । जया पासीं ॥ ३ ॥ तया गति ऐसी । ऐकतो मत्रासी ॥ नको दशा तैसी । तुका ह्मणे ॥ ४ ॥

॥ ७२७९ ॥ महा पापी पुरे आचरण खरें । त्रिभुवन विसरे जयालागीं ॥ १ ॥ कटकटा वोखटी बुद्धि हे नकटी । आह्मी निश्चय पाठीं जीच्या बैसों ॥ २ ॥ कीं या राज्यलोभा टाळू पुण्य स्तंभा । स्वजन वधारंभा प्रवर्त्तलों ॥ ३ ॥ तुका ह्मणे क्रोध आलिया शिरच्छेद । कीजे परी वेळ नको ऐसी ॥ ४ ॥

॥ ७२८० ॥ जरी मी निःशस्त्र उगा माझें गात्र । फाडिती हे अस्त्र घालूनियां ॥ १ ॥ अवये वरवाळे छेदो माझे गळे । परी मी नातळें विकल्पासी ॥ २ ॥ कल्याण हें मज माझें दीसे आज । तुका ह्मणे काज हेंचि बोले ॥ ४ ॥

॥ ७२८१ ॥ कुरुपती लागीं संजय प्रसंगीं । वदेकीं अवघी वार्त्ता ऐसी ॥ १ ॥ बोलोनी साकल्य पार्थिवा वैकल्य । द्यावया कैवल्य वांछी शांति ॥२ ॥ बाणेसी कमान हातींची सोडून । उगा तो आपण स्वस्थ बैसे ॥ ३ ॥ शोकें जाजावला विन्हळ चित्ताला । मोहें कवळीला तुका ह्मणे ॥ ४ ॥

## अध्याय दुसरा.

॥ ७२८२ ॥ श्री गुरुव्यासाचा शिष्या सद्विद्येचा । धृतराष्ट्र खेदाचा तोषदानी ॥ १ ॥ बोले राया देव उघड अपूर्व । तरीं हे वैभव भोक्ता होसी ॥ २ ॥ कृपेनें व्यापीला सांडित अश्रुला । येथें पार्थ भ्याला विषादानें ॥ ३॥ मग मधुरिपू शांतवी अमूप । शांत व्हावें वपू तुका ह्मणे ॥४॥

॥ ७२८३ ॥ बोले भगवान योग्या जो निधान । कसें कश्मलपण तुज आलें ॥ १ ॥ उदेलें विषमीं न लागे सत्कर्मीं । जेणें राहावें धामीं अकीर्तीच्या ॥ २ ॥ जोडी नरकासी हे दिसे आह्मासी । सागी बुद्धि ऐसी तुका ह्मणे ॥ ३ ॥

॥ ७२८४ ॥ पार्था षंढ होणें नको लाजिर्वाणें । तुज पूर्णपणें बाधक जें ॥ १ ॥ द्वाड हे कल्पना तूज हे साजेना । तुछ सागी रणालागीं ऊठ ॥ २ ॥ लंडीपण परंतपा हे त्यागी पां । मार्ग धरी सोपा वडीलांचा ॥ ३ ॥ तुका ह्मणे देवो बोलतां सद्भावो । वदे महा बाहो पुढें ऐका ॥ ४ ॥

॥ ७२८५ ॥ कैसा भीष्मद्रोणा भांडों जगजीवना । ज्यांसी बोलवेना विपरीत ॥ १ ॥ त्यांसी बाणवरी वर्षोनि समरीं । पाडों धरेवरी घडे कैसें ॥ २ ॥ तुका ह्मणे माया जीवीं झोंबलीया । विसरला क्रिया कौरवांच्या ॥ ३ ॥

॥ ७२८६ ॥ न मारीं गाया वडिलां गुरूतें । भिक्षा खाणें मातें श्रेय वाटे ॥ १ ॥ द्रव्यलाभें घात करावा या लोकीं । जेणें सर्वां मुखीं निंद्य व्हावें ॥ २ ॥ यांच्या रक्तें भोग माखुनी भोगावे । भक्षी मांसासवें मद्य जैसें ॥ ३ ॥ नको रे दयाळा घालुं या अकर्मीं । सुखी तूझे नामीं तुका म्हणे ॥ ४ ॥

॥ ७२८७ ॥ आह्मी जिंकूं बरें तेंच आम्हा देवा । किंवा मेल्या जीवा मोक्षपद ॥ १ ॥ दोन्ही मार्ग त्यागें जरी मारूं यांस । तथापी प्राणास चि-

रंजीव ॥ २ ॥ वांचों बहू काळ वंशवृद्धि करूं । न इच्छूं वेव्हारू तुका
ह्मणे ॥ ३ ॥
॥ ७२८८ ॥ या धर्माच्या श्रमें बुद्धि मूढ झालों । तुज शरण आलों
जगदीशा ॥ १ ॥ श्रीरंगा कल्याण ज्या माजी असेल । तोचि वदें बोल
आदराचा ॥ २ ॥ स्वामी सद्गुरु हो शिष्या मी तुमचा । धारक शिक्षेचा तुका
ह्मणे ॥ ३ ॥
॥ ७२८९ ॥ न तें दिसे कांहीं मम शोकनाशक । जो शोक शोषक
इंद्रियांसी ॥ १ ॥ समृद्धि राज्याची त्रिदशेंद्र लक्ष्मी । पावेन तरीं मी सुखी
नव्हे ॥ २ ॥ तुका दास विनवी अगा पुरुषोत्तमा । बोलतों तें क्षमा अप-
राध ॥ ३ ॥
॥ ७२९० ॥ संजय ह्मणे राया हृषीकेशाप्रती । केली हे विनंती गुडा-
केशें ॥ १ ॥ शेवटीं वचन बोले हें चि पार्थ । युद्ध आत्मस्वार्थ न करीं मी
॥ २ ॥ गोविंदाचें पदीं ठेविला मस्तक । जन्माचें सार्थक तुका ह्मणे ॥ ३ ॥
॥ ७२९१ ॥ त्यातें हृषीकेश हांसोनी बोलिला । विस्मय दाटला अ-
भ्यंतरीं ॥ १ ॥ विषाद जाणोनी कळवळिला हरी । बोलेंची उद्धरी संश-
यातें ॥ २ ॥ सैन्यद्वयामाजी संवादती दोघे । तुका ह्मणे जगा तारावया ॥ ३ ॥
॥ ७२९२ ॥ मेघगंभीररवें बोले रमानाथ । अयोग्य हा पंथ शोक
दीसे ॥ १ ॥ आह्मी जें बोलावें तें तंव राहिलें । पांडित्य निघालें तुह्मापून
॥ २ ॥ पांडित्य बोलसी शोकही करिसी । परि गा नेणसी निजहित ॥ ३ ॥
मेल्या जीत्या माजी शोका नेदी चित्त । तो मान्य पंडित तुका ह्मणे ॥ ४ ॥
॥ ७२९३ ॥ कधीं कोणे काळीं न होतों जी आह्मी । येथें कधीं तुह्मी
नसाल कीं ॥ १ ॥ हे राजे ह्या सेना ऐसे आप्त वर्ग । नव्हता प्रसंग समराचा ॥
॥ २ ॥ पुढें नाश झाल्या कोणीच उरेना । सृष्टी हे रचना जाय क्षया
॥ ३ ॥ तुका ह्मणे देव अनादि सांगतो । नित्यची वर्णितो खळची हा ॥ ३ ॥
॥ ७२९४ ॥ जीवास शरीरीं जैसें बाळपण । सवेंची तारुण्य अव-
स्था हे ॥ १ ॥ पुढें तैसें वृद्ध गळें देहशक्ती । पुढें मृत्यु प्राप्ती ठेविलीसे ॥ २ ॥
पुन्हा यम जाची पुन्हा जन्मा येणें । हें घडें रीतीनें अचुक कीं ॥ ३ ॥ तैसी
देहांतर प्राप्ति ओळखावी । मोहेना पदवी धैर्य तुका ॥ ४ ॥
॥ ७२९५ ॥ ऐके आतां पार्था सुखदुःख दोन । देती विषयपान कर्णा-
जेव्हां ॥ १ ॥ याचिलागीं नाश उत्पत्ती सोसावी । भारता ऐकावी नीती

माझी ॥ २ ॥ तुका ह्मणे देवो एक गूज सांगें । जेणें साधु अंगें पावे-खूणा ॥ ३ ॥

॥ ७२९६ ॥ पैंगा नदेतील व्यथा । जया पुरुषा समर्था ॥ १ ॥ सम भावना आरंभा । उत्तम नरीं पुरुषर्षभा ॥ २ ॥ दुःखीं सुखीं एक भावो । तोच मोक्षपुरीं रावो ॥ ३ ॥ आणिक सांगणें तें कांहीं । तुका वदे उरलें नाहीं ॥ ४ ॥

॥ ७२९७ ॥ असद्देहन जो नित्य । जीव सन्नतो अनित्य ॥ १ ॥ दो-हींचें तत्व या दोंत । ब्रह्म देख तत्वज्ञानें ॥ २ ॥ तुका करितो प्रार्थना । ज्ञ-णी ह्मणाल उमजेना ॥ ३ ॥

॥ ७२९८ ॥ नाशारहित जाणा तेंची । जग व्यापी सत्ता त्याची ॥ १ ॥ वार्त्ता तयाची कोणाला । नसे ठाऊकी जनाला ॥ २ ॥ त्याचा नाश या जीवानें । नव्हे कोटी ही साधनें ॥ ३ ॥ मग शोक अविनाशाचा । तुका ह्मणे मिथ्या वाचा ॥ ४ ॥

॥ ७२९९ ॥ देह नाशवंत पुरे । जीव ज्ञानसा चोखा रे ॥ १ ॥ अंश ब्रह्मीचा तो नित्य । नव्हे कधीं ही असत्य ॥ २ ॥ अविनाशी अप्रमेय । जाणुनि युद्ध करी स्वयें ॥ ३ ॥ तुका ह्मणे हा विकल्प । धरिल्या बाधील गा पाप ॥ ४ ॥

॥ ७३०० ॥ भेदवादी यांचें मत ॥ मारी ह्मणती ते नेमांत ॥ १ ॥ चार्वाकाचें ज्ञान खोटें । मेले ह्मणती अवचटे ॥ २ ॥ परी नेणती दोघेही । न तो मारी ह्मणे कांहीं ॥ ३ ॥ तुका विनवीतो संतां । चित्त देणें अपू-र्वता ॥ ४ ॥

॥ ७३०१ ॥ नव्हे जन्मची जयासी ॥ तया मृत्यु केवीं ग्रासी ॥ १ ॥ कधीं देहाचे संगती ॥ नेणे येणेजाण्याप्रती ॥ २ ॥ देहासंगें असतां नाहीं ॥ हेंचि साचें नवल पाही ॥ ३ ॥ अज नित्य शाश्वत तो ॥ दे-हें दृश्यें गवसेना तो ॥ ४ ॥ मारितां ही मारवेना ॥ तुका ह्मणे या पुरा-णा ॥ ५ ॥

॥ ७३०२ ॥ पूर्वोक्त याच्या लक्षणा । पुरुष जाणे विचक्षणा ॥ १ ॥ येऱ्हवीं या प्रकृतीला ॥ मारी कोण वेगळाला ॥ २ ॥ मारितो कैसा आ-तां ॥ तुका विनवीतो श्रोतां ॥ ३ ॥

॥ ७३०३ ॥ वस्त्रें जुनी त्यागुनियां ॥ नवीं घेणें पांघरावया ॥ १ ॥ शरीराचे तेच भावें ॥ येथें चैतन्यें वागावें ॥ २ ॥ जीर्ण देह त्यागे दुजा । तुका ह्मणे याच काजा ॥ ३ ॥

॥ ७३०४ ॥ याला न तोडिती शस्त्रें । वन्ही जाळीना शिखाग्रें ॥ १ ॥ न पाणी बुडवी यासी । वायु न उडवी बळेंसी ॥ २ ॥ शुष्क वातें अणुगर्भू । हा तो नित्यच स्वयंभू ॥ ३ ॥ सत्तामात्रें या निराळा । तुका म्हणे धन्य कळा ॥ ४ ॥

॥ ७३०५ ॥ छेदावया न हा योग्य । यत्न अग्नीचा अयोग्य ॥ १ ॥ नसे सुकला हा कधीं । भिजला नाहीं काय बाधी ॥ २ ॥ स्थाणुपरी स्थिर सर्वां । नित्याचळ भरली उर्वी ॥ ३ ॥ अचंचळ रूप ज्याचें । तुकया ध्यान लागे त्याचें ॥ ४ ॥

॥ ७३०६ ॥ ज्यासी आकाराचि नाहीं । त्याचें चिंतन तें कायी ॥ १ ॥ जेथें द्वैत हें शीरेना । निर्विकार हेंचि जाणा ॥ २ ॥ त्या कारणें यासि अ से-। शोक न धरी मानसें ॥ ३ ॥ केला शोक फळ काय । तुका ह्मणे वायां जाय ॥ ४ ॥

॥ ७३०७ ॥ आतां देहासवें होतो । जरी मरतो मानिशी ॥ १ ॥ तरी तुज महाबाहो । शोकग्रहो नसावा ॥ २ ॥ सर्व जाण तयांच्या राया पाहे हृदयां शोधोनी ॥ ३ ॥ तुका ह्मणे कृपावंता । दास ।चिंता तुज आहे ॥ ४ ॥

॥ ७३०८ ॥ जन्मा आलिया मरण । टाळी कोण अर्जुना ॥ १ ॥ मृत्युपाठिं लागे जन्म । कोण नेम ढांसळी ॥ २ ॥ परिहारा जे विरहित नेदीं चित्त त्या शोकीं ॥ ३ ॥ तुका ह्मणे जे अयोग्य । होय भोग्य कोठोनी ॥ ४ ॥

॥ ७३०९ ॥ भूतजाति आदि एक । प्रकाशक अव्यक्त ॥ १ ॥ मध्य व्यक्त याचा भाव । जो स्वभाव मृगजळीं ॥ २ ॥ लय अव्यक्तीं नेमिला । खेद आला तुज कैसा ॥ ३ ॥ उगी त्या चित्त वेदना । तुकया ध्याना ते नये ॥ ४ ॥

॥ ७३१० ॥ कोणी पाहती आश्चर्यें । निज धर्में साटोपें ॥ १ ॥ कोणी आश्चर्यीतें बोले । निके भले मन देती । २ ॥ कोणी आश्चर्यंया ऐके । वार्ता पिके मोक्षाची ॥ ३ ॥ कोणी नेणती ऐकुनी । ऐसी काहणी ह्मणे तुका ॥ ४ ॥

॥ ७३११ ॥ देहधारी न हा बद्ध । जो अबद्ध यमासी ॥१॥ सर्व देहांत भारता । पूर्ण सत्ता चिन्मय ॥ २ ॥ भूतें तरीं नाशवंत । खेद करीत कशाचा ॥ ३ ॥ नव्हेसि अर्जूना तूं योग्य । भवअरोग्य तुकया ॥ ४ ॥

॥ ७३१२ ॥ स्वधर्म पाहोनि कृपा । आली बापा ये वेळे ॥ १ ॥ तरि हें योग्य नव्हे दया । पतनीं काया घालील ॥ २ ॥ धर्मयुद्धारे वांचुनीं । श्रेय ये स्थानीं दिसेना ॥ ३ ॥ क्षत्रियाचे क्षात्र धर्म । तुका वर्में निवेदी ॥ ४ ॥

॥ ७३१३ ॥ अर्जिल्याविण झालें हें । पुरत्या पाहे दृष्टीनें ॥ १ ॥ द्वार उघडे स्वर्गाचें । भाग्य साचें म्हणोनी ॥ २ ॥ सुखी निर्भय तें ऐसें । क्षत्रिय हर्षे रणांगणीं ॥ ३ ॥ लाभ म्हणे तुकयाला । हाच आला जन्माचा ॥ ४ ॥

॥ ७३१४ ॥ आतां याच धर्मयुद्धीं । दृढ बुद्धि सोडिली ॥ १ ॥ न भांडेन म्हणोनियां । छंद वांयां घेतला ॥ २ ॥ तरी सत्कीर्ति जाउनी । निंदा जनीं पावसी ॥ ३ ॥ तुका म्हणे आनंदती । पाप हातीं धरलिया ॥ ४ ॥

॥ ७३१५ ॥ तुझी अपकीर्त्ती लोक । हे चंद्रार्क वाणीती ॥ १ ॥ पुरुष जो कीर्त्तिमान्य । त्या अमान्य हे गोष्टी ॥ २ ॥ मरण बरें एक वेळां । परी जिव्हाळा हा खोटा ॥ ३ ॥ तुका ह्मणे येथें निंद्य । तेथें वंद्य होईना ॥ ४ ॥

॥ ७३१६ ॥ भयें गेला रे पळाला । पार्थ भ्याला आह्मासी ॥ १ ॥ हांसतील महारथी । अर्थ स्वार्थी नाडू हा ॥ २ ॥ महारथी नाम तुझें । सांडेल वोझें ब्रीदाचें ॥ ३ ॥ तुका याच पंथें मान्य । घेसी अन्य लाघव ॥ ४ ॥

॥ ७३१७ ॥ बोलों न येती ते बोल । शस्त्रें खोल भेदिती ॥ १ ॥ बहु रिपु पार्थ तुज । देती लाज मनस्वी ॥ २ ॥ प्रताप तो निखंडूनी । विटंबणी चाळीती ॥ ३ ॥ दुःख कोणत्या परतें । जें तुकयातें सुख दे ॥ ४ ॥

॥ ७३१८ ॥ मेल्या येथें स्वर्गवास । हा तो मोडिला उल्हास ॥ आला वांटा स्वकर्मास । तो कोणास भंगेना ॥ १ ॥ नाहीं तरी भुजातेजें । जिंकिलिया कुरूराजे ॥ भूमंडळीचें भोगीजे । सर्व सुख नित्यानी ॥ २ ॥ ययालागीं शोक त्यागी । उठे धैर्य बळें अंगीं ॥ झुंझाचिये सेलभागी । अधिकारी तूं होई ॥ ३ ॥ तुका ह्मणे भूमिभार । उतरावा हा निर्धार ॥ यास्तव अनुभवसार । देवो त्यास निवेदी ॥ ४ ॥

॥ ७३१९ ॥ प्रीति धरिल्या जें पावे । सुख तेथें गा संभवे ॥ विषय वियोगीं हे लावे । दुःखार्णव लहरी ॥ १ ॥ दोहीं समबुद्धी धरी । लाभालाभ तपासरी ॥ मग तूं सुखें युद्ध करी । पाप माथां आदळेना ॥ २ ॥ निर्विकल्प तो निःसंगु । निःसंगीच अनुभवु ॥ तुकाह्मणे चांगू । निजमोक्ष आतुडे ॥ ३ ॥

॥ ७३२० ॥ बोलिलों येथें अर्जुना । सांख्य बुद्धी हेची जाणा ॥ सर्वांविशी तूं देखणा । हित घेई आपुलें ॥ १ ॥ योगीं बुद्धि धनुर्धरा । जींत बहुतसे विचारा ॥ त्यांत देइ कर्णद्वारा । जें स्वहित सर्वांचें ॥ २ ॥ अहो प्रत्यक्ष कर्मयोगें । योगीं रचा अंतरंगें ॥ धुवंग ने घेणें जग । तारावया बुद्धीतें ॥ ३ ॥ आतां तिच्या संगतीनें । कर्मबंधें मुक्त होणें ॥ तुका ह्मणे सावधपणें । बुद्धिवंतें ऐकावीं ॥ ४ ॥

॥ ७३२१ ॥ विघ्नें छळितां पूर्ण । दिसो येतें येथें गौण ॥ मिथ्या प्रत्यवायपण । नास्तिकत्वें उडेल ॥ १ ॥ महा भयातेंही नाशी । भुतां जेंवि देवलसी ॥ कीजे स्वल्प ईश्वरासीं । अर्पिल्याचें हें फळ ॥ २ ॥ तुका ह्मणे दीनानाथ । हीन दीन पाहुनि पार्थ ॥ दया करोनि परमार्थ । हातीं त्याच्या देतसे ॥ ३ ॥

॥ ७३२२ ॥ निश्चयाची एक बुद्धी । जे का वारक उपाधी ॥ यया मार्गांमधीं । एक कुरुनंदना ॥ १ ॥ बहु शाखा भवरुखा । छाया शीतळ स्वात्मिका ॥ जे ते अनंत कामुका । वुजवणि जाहाली ॥ २ ॥ तुका म्हणे बुद्धियोगें । साधक तरती निजांगें ॥ कोणी कुबुद्धी कुसंगें । प्राणीमात्र बुडाले ॥ ३ ॥

॥ ७३२३ ॥ मूढ उद्बोधनीं प्रीती । वेदीं गर्जिन्नल्या श्रुती ॥ साधन योगाच्या हातीं । स्वर्ग फूल अर्पीती ॥ १ ॥ चाळवले बहु गेले । मुर्खीं फळ तें मानिलें ॥ ते वेदवादीं रतले । नाहीं पाहिले अनुभव ॥ २ ॥ स्वर्गापरतें नाहीं सुख । ऐसे पावले मूढ देख ॥ तुका देवापासीं सुख । अक्षयाचें मागत ॥ ३ ॥

॥ ७३२४ ॥ थोरा कर्में साधे धनें । जन साधिती साधनें ॥ नावेक होत्या मार्गानें । द्विज वृंदें चालिलीं ॥ १ ॥ भोग भोग्य गती अशा । मत्स्य लुब्ध गळा मिषा ॥ स्वर्ग पर पैं दुराशा । जन्म कर्म फळद्रूप ॥ २ ॥ तुका ह्मणे वास नेला । भोग गोडी अशोपाला ॥ सुख जाय मग शोकाला । प्राप्त होणें अखंड ॥ ३ ॥

॥ ७३२५ ॥ भोगाभ्यासें भाग्य दिसे । सक्त होई मानसें ॥ जैसें सकामासी पिसे । पैं नारीचें लागलें ॥ १ ॥ हरिली कामनेनें बुद्धि । उरों नेदी आत्मशुद्धि ॥ हिंवे पिडला तो कधीं । प्रावरणासि सोडिना ॥ २ ॥ मग समता समाधींत । बुद्धि घालूं नेदी हात ॥ तुका म्हणे प्रेत । काय जाणें अमृता ॥ ३ ॥

॥ ७३२६ ॥ कामिक चित्ताचें रंजन । वेद बोलिला वचन ॥ परी विषय ते सान । मानिता चि पोससी ॥ १ ॥ पार्था निष्काम होय तूं माझें वाक्य धरुनी तूं ॥ जैसा निर्द्वंद्व निश्चितू । नित्य सत्व न सोडी ॥ २ आत्मवेत्ता होऊनियां । त्यागी कल्पनीक माया ॥ तुका म्हणे काया । काळ जैसा सांडवी ॥ ३ ॥

॥ ७३२७ ॥ स्वल्पोदकीं जें जें कार्य पैं उपजे । तें तेंच निपजे डोहामाजी ॥ १ ॥ वेदक्रिया काम्य उद्भवे नियम्य । तें तें घडे साम्य ब्रम्हबोधीं ॥ २ ॥ ब्रम्हीं जो ब्रम्हज्ञ सुखी तो सर्वज्ञ । तुका म्हणे प्राज्ञ पुऐका ॥ ३ ॥

॥ ७३२८ ॥ अधिकार कर्मीं तूं तें आहे पार्था । परी न सर्वथा फळें त्याच्या ॥ १ ॥ कंटाळुन जरी त्याग कर्मीं धरी । ते या धरेवरी अयोग्य के ॥ २ ॥ ह्मणी फळ आशा धरीसी वीरेशा । तुका म्हणे नाशा कारण हें ॥ ३

॥ ७३२९ ॥ सिद्धि गेलें कर्म तरी ना संभ्रम । आणि उपोपरम जा नेदी ॥ १ ॥ ऐसें करी चित्त कर्म आचरत । फळीं त्याचा हेत न ठेवून ॥ २ ॥ योगस्थ करावें समत्वीं भरावें । तुका म्हणे व्हावें जीवन्मुक्त ॥ ३

॥ ७३३० ॥ बुद्धि योगाहून कर्म योग सान । धनंजया ज्ञान बु ऐसें ॥ १ ॥ पाहे रक्षक या बुद्धि कुरुराया । तुच्छ कर्म तूं या टाकी फ ॥ २ ॥ प्रकृतीवांचूनी भांबावले ज्ञानी । तुका म्हणे ज्यांनीं आटाआटी॥ ३

॥ ७३३१ ॥ जितां पापपुण्य नाशी बुद्धिगुणें । ज्याची पैं अगण सद्वासना ॥ १ ॥ ह्मणोनी पांडवा बुद्धियोगघ्यावा । कर्मीं अनुभवा कुशळत्वें ॥ २ ॥ येणे मार्गें जाणें कर्मासी तोडणें । आनंदभोगणें ह्मणे तुका ॥ ३ ॥

॥ ७३३२ ॥ शास्त्रज्ञ जे बुद्धीयुक्त पैं विशुद्धी । कर्मफळ विधी सोडूनियां ॥ १ ॥ प्रपंचबंधन विवेकें तोडून । पावती निर्वाण निर्दोषीक ॥ २ तुका ह्मणे देव ज्ञानाचा अनुभव । सुगम हे ठेव साधकाची ॥ ३ ॥

॥ ७३३३ ॥ अज्ञान मोहमय व्याप्त चित्त स्वयें । तेव्हां तेज पाहे तेच बुद्धि ॥ १ ॥ मग श्रुताश्रुत भोगाची प्रतीत । झाल्या प्राप्त होत वैराग्य तें ॥ २ ॥ तुका ह्मणे प्राण पश्चात्तापाविण । न देखे निर्गुण वैराग्य तें ॥ ३ ॥

॥ ७३३४ ॥ फळांच्या श्रवणें तत्र बुद्धि शिणे । तेणें मेळवणें निरंतर ॥ १ ॥ ते शुद्ध व्हावया समाधी आलीया । जेव्हां कां विसांया बुद्धि येते ॥ २ ॥ तेव्हां तूं पावसी माझिया योगासी । देव अर्जुनासी ऐसें बोले ॥ ३ ॥ ऐकावया चित्त एकाग्र मारूत । तुका ह्मणे मात धन्य झाली ॥ ४ ॥

॥ ७३३५ ॥ बोले पांडुपुत्र देवासी उत्तर । सांगा कोण नर स्थितप्रज्ञ ॥ १ ॥ जो कां समाधिस्थ सर्वदा नेमस्त । केशवा प्रशस्त बोलावे जी ॥ २ ॥ वागतो या जगीं कैसा हो प्रसंगीं । तुका ह्मणे उगी निगी कैसी ॥ ३ ॥

॥ ७३३६ ॥ अगा ये अर्जुना सावधान मना । जेणें या कामना टाकियेल्या ॥ १ ॥ स्वरूपीं मानस तोषलें सुरस । निधी पायाळास तयारीतीं ॥ २ ॥ स्थितप्रज्ञ तोची ह्मणूं सव्यसाची । समाधी जयाची अखंडीत ॥ ३ ॥ आनंदें भरीत सर्वकाळ चित्त । तुका ह्मणे स्थितप्रज्ञ ऐसा ॥ ४ ॥

॥ ७३३७ ॥ न दुःख मानसीं उद्विग्न होईना । सुखेंही वांछीना श्रम सोसे ॥ १ ॥ आस्था न धरीच आसोनीयां आनी । कामक्रोध मनीं भयातीत ॥ २ ॥ स्थितबुद्धि मूनी तयास ह्मणावें ॥ तुका म्हणे पावे महासुख ॥ ३ ॥

॥ ७३३८ ॥ सर्वा देहीं प्राण समान सापरी । नाठवे अंतरीं गुण दोष ॥ १ ॥ बऱ्यावाईटाचा घे तूं अनुभव । होऊं नेदी जीव कासावीस ॥ २ ॥ मुखें उच्चारीता तोचि प्रज्ञावंत । प्रतिष्ठा पावत म्हणे तुका ॥ ३ ॥

॥ ७३३९ ॥ कूर्म जैसा भावरोधी शरीराचा । तैसा इंद्रियांचा मेळू धरी ॥ १ ॥ अवरोनि असे ऐसा जो योगीया । प्रज्ञा साची तया प्रतिष्ठीत ॥ २ ॥ पर्वकाळीं दान सुकृत दासाचें । तैसें प्रपंचाचें तुका मानी ॥ ३ ॥

॥ ७३४० ॥ योगी वीतरागी त्याचें एक मन ॥ भोग नसतां जाण वासना हे ॥ १ ॥ जरी आसे तरी ब्रम्हात्म दर्शनीं । मुक्त येथें ज्ञानीं होऊं सरती ॥ २ ॥ तुका म्हणे मन झालीया निश्चळ । तेंचि तें केवळ परब्रम्ह ॥ ३ ॥

॥ ७३४१ ॥ आत्मज्ञानी नर जो पूर्ण प्रयत्नी । कौंतेया जो ध्यानीं माझ्यारूपीं ॥ १ ॥ परि इंद्रियांसी विसांवला जरी । तरी ते अघोरीं घाल-

तील ॥ २ ॥ तुका ह्मणे मन इंद्रियां स्वाधीन । म्हणोनि साधन विघ्न-
पावे ॥ ३ ॥

॥ ७३४२ ॥ तया मनालागीं आवरोनि आसे । युक्तराज तसे
मत्पर जे ॥ १ ॥ इंद्रियेंहि वश ज्याला पैं असती । त्याची प्रतिष्ठित प्रज्ञा
होय ॥ २ ॥ तुका म्हणे येथें कुसंग नसावा । तेणेंचि पावावा निज
मोक्ष ॥ ३ ॥

॥ ७३४३ ॥ चिंती विषयांला उपजे वासना । भोग हा पुरेना विष-
याचा ॥ १ ॥ तो या कामालागी उत्पन्न करितो । काम तो निर्मितो क्रोध-
रूपा ॥ २ ॥ तुका म्हणे बीजापासुनी अंकुर । होती हा विस्तार येच
परी ॥ ३ ॥

॥ ७३४४ ॥ क्रोधें देहात्मता बुद्धि हे उपजे । मोहें कवळी जे अंतः
कर्ण ॥ १ ॥ तेथुनियां आत्मस्मृतिभ्रंश जाण । स्मृतिभ्रंशें जाण बुद्धि
नाश ॥ २ ॥ मग तेथुनीयां पूर्ववतमूढ । होतसे सदृढ म्हणे तुका ॥ ३ ॥

॥ ७३४५ ॥ रागद्वेषावीण इंद्रियें स्वाधीन । तरी तेणें मन सोडवेना
घेतसे विषय परि विशुद्धात्मा । प्रसादीं महिमा पावेल तो ॥ २ ॥ हरिहर
मन झालें जें अर्पण । तुका ह्मणे पूर्ण प्रसाद तो ॥ ३ ॥

॥ ७३४६ ॥ प्रसादें याचिया सर्व दुःखा नाश । पावे अविनाश महा
सुख ॥ १ ॥ प्रसन्न ते बुद्धी चित्ताची आयती । पावे तो महंती प्रतिष्ठेची
॥ २ ॥ शीघ्र तया सर्व लाभे महा लाभ । तुका ह्मणे स्तंभ सुकृताचा ॥ ३ ॥

॥ ७३४७ ॥ अयुक्त जो त्याला नसे बुद्धि पार्था । ध्यानाचिया पंथा
जावों नेणें ॥ १ ॥ ध्यान नाहीं तेथें शांति ही वसेना । सुख आठवेना अ-
शांतासि ॥ २ ॥ तळमळी चित्त कैंचे त्याचें हीत । तुका ह्मणे अंत सद्वि-
घेसी ॥ ३ ॥

॥ ७३४८ ॥ इंद्रियें वर्ततां जे कां । मना देती मोकळिका ॥ १ ॥ त-
याचि रे मग बुद्धी । हरोनि नेत देहशुद्धी ॥ २ ॥ वारा लागलीया
नाव । पावो नेणें पैल ठाव ॥ ३ ॥ तुका ह्मणे साधकानें । बोध मानीजे
सुखानें ॥ ४ ॥

॥ ७३४९ ॥ तस्मात इंद्रियें । सर्व ज्याची मनोमयें ॥ १ ॥ विषया
पासोनी । जो बैसला आटोपोनी ॥ २ ॥ महाबाहो प्रज्ञा त्याची । महिमा
पावे प्रतिष्ठेची ॥ ३ ॥ तुका ह्मणे आतां । लाभ घेणें सावध श्रोता ॥ ४ ॥

॥ ७३५० ॥ ब्रह्मीं लीन त्याची राती । जेथें लोक हे वागती ॥ १ जागा जेथें साधु राहे । तेथें लोक झोंपी जाये ॥२॥ विषयीं सावध जन । तेथें याचें भ्रांत मन ॥ ३ ॥ तुका विनवी थोडिये । सुख जोडणें जोडिये ॥ ४ ॥

॥ ७३५१ ॥ नाना उदक श्रव । पाहे उदकाचा ठाव ॥ १ ॥ तरि मर्यादा न सांडी । पृथ्वी राखीतो कोरडी ॥ २ ॥ तैसे भोग भोगी सारे । मस्त नोहे अविचारें ॥ ३ ॥ निष्कामाचें पावे फळ । जरी कुटुंबी केवळ ॥ ४ ॥ शांति बाणे त्याचे अंगीं । शिव वेष्टित भुजंगीं ॥ ५ ॥ अविषम ते पद्वी । तुकया समचीं भोगावी ॥ ६ ॥

॥ ७३५२ ॥ सर्व भोग विषयाचे । सुख थुंकूनी कामाचे ॥ १ ॥ भोग भोगी निस्पृहाचे । आत्मानंद पद्वीचे ॥ २ ॥ परि मी आणी माझें । दोनी नातळती वोझें ॥ ३ ॥ ज्ञानी शांतिस पावतो । तुका ह्मणे मम गुरु तो ॥ ४ ॥

॥ ७३५३ ॥ हे तो ब्रह्मींची राहाटी । पाहे पार्था ज्ञानदिठीं ॥ १ ॥ इचें घर पावलिया । मोह शिवेना हृदया ॥ २ ॥ अंत झाला इच्या संगीं । सायुज्यास पावे अंगीं ॥ ३ ॥ तुका म्हणे वाट । केली सुलभ हे नीट ॥ ४ ॥

---

## अध्याय तिसरा.

---

॥ ७३५४ ॥ पार्थ वदे वासुदेवा । प्रश्न आमुचा ऐकावा ॥ १ ॥ कर्मागळी बुद्धी होय । ऐसा सांगतां प्रस्ताय ॥ २ ॥ तरी घोर कर्मीं यया । जनार्दना घालावया ॥ ३ ॥ चिंतेपासुनी केशवें । तुका ह्मणे जी सोडावें ॥ ४ ॥

॥ ७३५५ ॥ या मिश्रित उत्तरा । ऐकोनी खेद अंतरा ॥ १ ॥ बुद्धि स्थिति भांबावली । वृत्ति शौर्याची लाजली ॥ २ ॥ एक पंथ निवडून । सांग जयांत कल्याण ॥ ३ ॥ श्रेय पावे जयास्तव । तुकया भयें नेणें जीव ॥ ४ ॥

॥ ७३५६ ॥ हांसोनि बोले राधाप्रिय । हें कौंतेया अवधारी ॥ १ ॥ निष्ठा द्विविध या लोकीं । पूर्वीं असे कीं बोलिली ॥ २ ॥ ज्ञानयोगें चि सांख्याला । असे केला निश्चयो ॥ ३ ॥ सत्कर्मे कर्म योगी । तुका भोगी जें सूख ॥ ४ ॥

॥ ७३५७ ॥ जे कां कर्मातीत । सिद्ध प्राप्त चोखट ॥ १ ॥ परी कर्म केल्याविण । कोण सीण मुकला ॥ २ ॥ कर्म संन्यास मात्रें । सिद्धी वक्रें न पाहे ॥ ३ ॥ ययालागीं तुका वाणी । हे निशाणी कर्माची ॥ ४ ॥

॥ ७३५८ ॥ अहो कर्म केल्याविण । वागे कोण पृथ्वीस ॥ १ ॥ एक पळ न ठरे कधीं । कर्म संधींवांचूनि ॥ २ ॥ हटें छंदें करविती । कर्म प्रकृती या गुणें ॥ ३ ॥ तुका म्हणे कर्मातीत । त्या अनंत मानीना ॥ ४ ॥

॥ ७३५९ ॥ कर्मेंद्रिया आनिवारा । तो पसारा आवरूनी ॥ १ ॥ मनीं चिंतीं विषयांस । कर्म संन्यास साधुनी ॥ २ ॥ डोळे झांकों मूढ बसे । मिथ्या दिसे दंभ तो ॥ ३ ॥ तुका विनविते संता । ऐसी वार्ता जुनाट ॥ ४ ॥

॥ ७३६० ॥ अरे पार्था इंद्रियांला । मनें त्यांला आवरी ॥ १ ॥ कर्मेंद्रियीं कर्मयोग । करी निःसंग थोर तो ॥ २ ॥ निष्कामाचें जे भजनें । तुका ह्मणे विश्रांती ॥ ३ ॥

॥ ७३६१ ॥ कर्मत्यागाहुनि कर्म । श्रेष्ठा वर्म मानतें ॥ १ ॥ तें तूं करी विचक्षणा । अंतःकरणा जे शुद्धी ॥ २ ॥ देह निर्वाह काळजी । नलगे माझी मी जाणें ॥ ३ ॥ कर्म सोडिलिया खोटें ॥ मग उफराटें बाधील ॥ ४ ॥ तुका म्हणे जगीं खंती । कर्माहातीं न पडावें ॥ ५ ॥

॥ ७३६२ ॥ देव पितृ यज्ञ । जे वेदज्ञ जाणती ॥ १ ॥ थावीण मिथ्या येर । नेदी थार परलोकीं ॥ २ ॥ संगत्यागें त्या प्रीत्यर्थ । घे परमार्थ करतळीं ॥ ३ ॥ माझी प्राप्ती जयामाजी । तुका आजी पावला ॥ ४ ॥

॥ ७३६३ ॥ प्रजा यज्ञा संगें विधि । पूर्व बुद्धी प्रेरि तूं ॥ १ ॥ जे निर्माण झाले लोक । त्यांस शोक नसावा ॥ २ ॥ कीं या मखें पावा वृद्धी । कामसिद्धि धेनु वा ॥ ३ ॥ तुका ह्मणे अशीर्वाद । भवखेदवारकु ॥ ४ ॥

॥ ७३६४ ॥ देवा भजाया अध्वरें । फळ खरें देतील ॥ १ ॥ तुह्मा लाभचि जाणावा । नित्य भावा नुतन ॥ २ ॥ अन्योन्य भजतां ऐसें । फळ अनायासें श्रेयाचें ॥ ३ ॥ तुका वदे धर्मयज्ञीं । साह्य सुज्ञीं असावें ॥ ४ ॥

॥ ७३६५ ॥ इष्ट भोग देती तुह्मा । ऐसा महिमा देवांचा ॥ १ ॥ यज्ञ देव पूजिलीया । तुमची क्रिया सफळ ॥ २ ॥ देवीं दिलें देवांस । नेदी तामस चोर तो ॥ ३ ॥ तुका ह्मणे आत्मपोटा । ढोर ताटा चघळीत ॥ ४ ॥

॥ ७३६६ ॥ यज्ञाचें शेष खाणारे । पाप हारे दर्शनें ॥ १ ॥ आत्मादरासाठीं नेम । तो अधर्म व्यापारू ॥ २ ॥ पापी पापाचि ते खाती । जे रांधिती स्वेच्छेनें ॥ ३ ॥ तुका म्हणे रोगी जैसे । घेऊं बैसे पथ्यासी ॥ ४ ॥

॥ ७३६७ ॥ भूतें अन्नरसें होती । अन्नोत्पत्ति पर्जन्यें ॥ १ ॥ यज्ञें करूनि पर्जन्य । लोकीं मान्य जो तिहीं ॥ २ ॥ यज्ञकर्मापासूनियां । वर्म तुकया ठावकें ॥ ३ ॥

॥ ७३६८ ॥ वेदापासूनियां कर्म । उघड वर्म कळतें ॥ १ ॥ वेद अक्षर संभव । वासूदेव बोलती ॥ २ ॥ तस्मात्सर्वगतहि । श्रुतिग्वाही साधका ॥ ३ ॥ प्रतिष्ठित यज्ञीं सदा । तुकया छंदा पालक ॥ ४ ॥

॥ ७३६९ ॥ ऐसें वर्तविलें चक्र । कर्म सूत्र यज्ञाचें ॥ १ ॥ लोकीं न वर्तवी जो का । व्यर्थ असका यातिचा ॥ २ ॥ वृथा आयुष्य पातकी । इंद्रिय मुखीं घालीतु ॥ ३ ॥ तुका ह्मणे वायां भ्रष्ट । केले कष्ट निष्फळ ॥ ४ ॥

॥ ७३७० ॥ श्रद्धा आत्मस्वरूपीं भली । वृत्ति रंगली विटेना ॥ १ ॥ आत्मलाभें झाला तृप्त । भक्त्यासक्त भावार्थी ॥ २ ॥ स्वरूपीं तुष्ट झालें मन । जन विजन सारिखे ॥ ३ ॥ त्याला नसे हे खटपट । तुकया पेठ कौलाची ॥ ४ ॥

॥ ७३७१ ॥ नसे फळ त्याच्या कर्मैं । अविश्रमे विरक्तु ॥ १ ॥ प्रत्यवाय उणेपणीं । हे तो काहाणी संपली ॥ २ ॥ न ज्यास सर्व भूतीं । कांहीं प्रीती फळाची ॥ ३ ॥ इच्छा नाहीं ह्मणे तुका । तो नेटका मुक्त पैं ॥ ४ ॥

॥ ७३७२ ॥ यालागीं वीरा पार्था । कामीं निष्काम अर्था ॥ सदा आपुले परमार्था । साधकानें पाहाणें ॥ १ ॥ करावें तें न सांडे कीं । कर्मरेषा नेटकी ॥ करी पार्थिवा बाकी । झाडावया पाशाची ॥ २ ॥ काम त्यागिल्या निष्काम । पुरुष पावे परब्रह्म ॥ तुका ह्मणे वर्म । सुटें केलें निर्मळ ॥ ३ ॥

॥ ७३७३ ॥ कर्में चि कविता सिद्धी । प्राप्त श्रेष्ठास त्रिशुद्धी ॥ जनकादिक राज्यामधीं । पूर्ण झाले विदेही ॥ १ ॥ वैराग्य झालें पुरें । आत्मतत्त्व कळे खरें ॥ तरी लोक संग्रहारे । या कर्मासि न सांडूं ॥ २ ॥ तुका ह्मणे पार्थाप्रती । कर्ममार्गाची पद्धती ॥ देव सांगे लोकस्थिती । आदिअंतीं पाळणें ॥ ३ ॥

॥ ७३७४ ॥ जैसें आचरती श्रेष्ठ । तो परनिष्ठ पडे मार्ग ॥ १ ॥ तैसें इतर लोक । हा विवेक चालिती ॥ २ ॥ श्रेष्ठ निर्णया सारिखे । जग या सुखें मनावें ॥ ३ ॥ तुका म्हणे सुफळ न्याय । वेदराय सभेचा ॥ ४ ॥

॥ ७३७५ ॥ पार्था तूं मातें पाहे । नसे कांहीं हि संदेह ॥ पूर्णरूप ब्रम्ह देह । जन सर्वही जाणती ॥ १ ॥ नसे कांहीं कर्तव्यता । किंवा फळइच्छा चिंता ॥ तरी या लोकीं आतां । वागे जगासारिखा ॥ २ ॥ अवाप्त सर्वही कामीं । कामीं असोनि निष्कामी ॥ तुका म्हणे तरि नामीं । वर्ते कर्मी निरत ॥ ३ ॥

॥ ७३७६ ॥ कर्मी जरी न वर्ते मी । सुखें राहे स्वात्मधामीं ॥ यत्न पूर्वक करी नामीं । मार्गयोनी धर्माचा ॥ १ ॥ मग तैसीच राहाटी । पडे जग परीपाठी ॥ जो तो म्हणेल देव हटी । नाहीं कर्मी वागला ॥ २ ॥ मग कांहो आपणास । आश्रम धर्माचा सायास ॥ भक्ष्य भक्षवे सुरस । पेऊं अपेय पान जें ॥ ३ ॥ भक्त नाहीं देव नाहीं । गुरु शिष्य नाम नाहीं ॥ राजा नाहीं प्रजा नाहीं । ऐसा मार्ग पडेल ॥ ४ ॥ स्वर्ग नरक मिथ्या शब्द । वृथा शास्त्र वृथा वेद ॥ तुका म्हणे कलिछंद । मग सहज अनिवार ॥ ५ ॥

॥ ७३७७ ॥ आधींच हें मायामय । जग अनिवार होय ॥ सांडोनियां स्वार्थन्याय । भलता पंथ स्वीकारी ॥ १ ॥ त्यांत आमुची वर्तणुक । जरी देखती न्यूनक ॥ भ्रष्ट होती मग अधिक । पैंगा चिंता हे मनीं ॥ २ ॥ जरी कर्मी न वागें मी । स्वेच्छा करीन अन्यकामीं ॥ तरी प्रजा रक्षण नेमी । प्रभु ऐसा होईना ॥ ३ ॥ तुका म्हणे धाके ऐसा । देव वागे सम माणसा ॥ आपण तारक तो सहसा । येर बुडतां कळवळी ॥ ४ ॥

॥ ७३७८ ॥ कर्में नेमिलीं विधीनें । सिद्धि जावया साधनें ॥ फळप्राप्तिचीं संधानें । अज्ञानास आनंदू ॥ १ ॥ तैसें अवघें नाशवंत । ज्ञानी सिद्धातें संमत ॥ जाणते जे ज्ञाले संत । तरी कर्मा नये सोडूं ॥ २ ॥ लोक संग्रहो भारता । रक्षणें हा मार्ग आतां ॥ पूर्ण सृष्टीचीया हिता । तुका ह्मणे कळवळे ॥ ३ ॥

॥ ७३७९ ॥ व्हावी कामना संपूर्ण । काम्यहेतूच तूं जाण ॥ तैसेंच मग तूं साधन । कर्मठ ऐसें बोलिजे ॥ १ ॥ अज्ञान झोंबिन्नलें । ऐसें दृष्टीनें पाहिलें ॥ तरी त्याचें अंतर भलें । भेदूं नये सज्ञानें ॥ २ ॥ जरी तत्ववेत्ता ज्ञाला । अथवा प्राप्त पुरुष भला ॥ तरी जनांच्या कर्माला । तेज द्यावें म्हणे तुका ॥ ३ ॥

॥ ७३८० ॥ कर्में सर्व प्रकृतीच्या । गुणीं खेळची मायेचा ॥ सोडिलीं तीं ज्याच्या त्याच्या । पुन्हा गळीं लागती ॥ १ ॥ जंववरी देहसंगू । तंव न सुटे प्रसंगू ॥ उगा आग्रही उल्लंघू । पाहातां येथें नाडेल ॥ २ ॥ अहंकारें मूढ बुद्धी । म्हणे माझी हे उपाधी ॥ तुका म्हणे कधीं । सुटे ऐसी दिसेना ॥ ३ ॥

॥ ७३८१ ॥ तत्त्वज्ञीं गुण कर्माला । भेदोन अकर्त्याला ॥ पाहे स्वस्व विषयांला । इंद्रियें हीं वर्तती ॥ १ ॥ जाणिवेचें तुझें अंग । महाबाहो प्रेमें चांग ॥ वश वर्ती लक्ष्मी रंग । भाग्य पूर्ण पांडवा ॥ २ ॥ स्वकर्माचें पाळण । कीजे नको उत्थापन ॥ तुका बोलिला साधन । तेंच पाहे सर्वदा ॥ ३ ॥

॥ ७३८२ ॥ लागती प्रकृतीछंदीं । पडावया मोहोबंदीं ॥ वृथा संसाराची मांदी । मेळविती पुष्कळ ॥ १ ॥ गुणीं रिझले प्रकृतीचे । मूढ भावें विषयीं लांचें ॥ अज्ञान पाहोनि काचे । खवळूं नये सर्वज्ञें ॥ २ ॥ मोठें अहंकारीं पाप । घेऊनि मायेचें निज माप ॥ उगाणीती विषयदाप । तुका त्यासीं दाविना ॥ ३ ॥

॥ ७३८३ ॥ कर्म काय होईल जें । प्रकृतीच्या योगबीजें ॥ तें तें मम रूपीं अर्पिजे । सर्वाध्यात्ममतीनें ॥ १ ॥ टाकूनि ममता आशा । युद्धा करी तूं वीरेशा ॥ विगतताप माझी दशा । तुझ्या अंगीं बाणेल ॥ २ ॥ ऐकतांच तो बोल । आला पार्था अंगीं डोल ॥ तुका म्हणे फोल । झाला सर्व संशय ॥ ३ ॥

॥ ७३८४ ॥ उपेक्षून गुणदोषादि लक्षण । निःप्रांजळपण बोलिलों कीं ॥ १ ॥ तैसेंच पाहावें हेंच अनुष्ठावें । सुखेंचि सुटावें कर्मबंधें ॥ २ ॥ मानव तराया दोष संहाराया । केली नौका व्हाया पैलपार ॥ ३ ॥ तुका म्हणे जड नायकती मूढ । पुढें ही दगड होऊनि राहाती ॥ ४ ॥

॥ ७३८५ ॥ अथवा कुटिळ द्वेष ठेवी खळ । ज्यासि देहीं मळ अहंतेचा ॥ १ ॥ हें मत सोडोनी दोषही जोडोनी । आतममत मनीं अनुष्ठीती ॥ २ ॥ तरी ज्ञानमार्गीं सर्वांच्या अंसगीं । बुद्धि भ्रंशे जगीं विमूढ ते ॥ ३ ॥ तुका म्हणे देवा वारिष्ठ जाणावा । अव्हेर कसवा जेणें याचा ॥ ४ ॥

॥ ७३८६ ॥ ज्ञानी पूर्ण झाला शाल्लें उमजला । परी त्या लागला पूर्व संगू ॥ १ ॥ प्रकृती हे मिळे प्राचीनाच्या बळें । तैसी बुद्धि खेळे साधूची कीं ॥ २ ॥ पंच भूत भव वेगळे गौरव । देती अनुभव क्षणक्षणा ॥ ३ ॥ प्रकृति स्वाधीन पडली म्हणोन । निग्रही अज्ञान म्हणे तुका ॥ ४ ॥

॥ ७३८७ ॥ पांचा विषयांची गोडि आत्मरुची । घेती तैं रागाची वस्ती होते ॥ १ ॥ वाईट पाहिलें क्लेशें उपेक्षिलें । द्वेषाचें हें झालें जन्मस्थान ॥ २ ॥ राग द्वेष दोन वैरी पुरातन । न व्हावें स्वाधीन तुका म्हणे ॥ ३ ॥

॥ ७३८८ ॥ भलताही स्वधर्मयोनीसंभवकर्म । उत्तमें उत्तम अनुष्ठिजे ॥ १ ॥ अगुणी झालीया देतु महाश्रेया । जैसी बाळा माया लांसी जरी ॥ २ ॥ स्वधर्मी मेले जे घेत रमा सेजे । परधर्मा रिझे वायां जाय ॥ ३ ॥ वधूचें कुरूप ज्याचें तया सुख । पराव्यासी विख होऊं ठाके ॥ ४ ॥ तुका म्हणे स्वधर्मकर्मेंची वर्तावें । परधर्में पावावें पतनालागीं ॥ ५ ॥

॥ ७३८९ ॥ पार्थासी संदेह देवा पुसताहे । आतां कोणें आहे पाठवीला ॥ १ ॥ करितो पापासी सांगावें आह्मासी । बळें योजी ऐशी इच्छा नसतां ॥ २ ॥ अनिच्छे आदळी दोषाचळमोळी । सांगे हे नवाळी वाष्णेंया तूं ॥ ३ ॥ तुका म्हणे प्रश्न हिताचा ऐकून । बोलिला नंदन वसुदेवाचा ॥ ४ ॥

॥ ७३९० ॥ अगा धर्मभ्रात्या नीतीच्या जाणत्या । कामक्रोधास त्या दया नाहीं ॥ १ ॥ रजोगुणें वाढ तमाचेनी प्रौढ । सत्व गुणा मूढ केलें ईहीं ॥ २ ॥ खाउनि आकल्प तृप्ति नेणे स्वल्प । विवेकासी पाप लावितीं हे ॥ ३ ॥ म्हणोनि न्यायाचे मार्ग पाडायाचे । तुका म्हणे यांचें कुशलत्व ॥ ४ ॥

॥ ७३९१ ॥ विस्तु धुरें वेढे नवल हें मोठें । ऐके साचे फांटे जन्म खळ ॥ १ ॥ आरसा मळानें गर्भासी नाळानें ॥ कीं तत्वें वेश्यानें जिंकी तैसा ॥ २ ॥ चैतन्या शेजारी वस्ती नीरंतरी । अनिवार भारी म्हणे तुका ॥ ३ ॥

॥ ७३९२ ॥ ज्ञान जरी शुद्ध होतें असंबद्ध । वेष्टन प्रसिद्ध याचें म्हणुनी ॥ १ ॥ नित्यारि ज्ञान्याचा हाचि सत्य वाचा । कामना रूपाचा गोंध-

ळु जो ॥ २ ॥ अग्निवत भारी जयाची दुधारी । तुका म्हणे मारी वैराग्यासी ॥ ३ ॥

॥ ७३९३ ॥ इंद्रिय मन बुद्धि हीं कामाधिष्ठानीं । बोलिजे सज्ञानीं तेंही खरें ॥ १ ॥ येणेंचि मोहित ज्ञान होतें खरें । बुडाले नुद्धरे गर्वडोहीं ॥ २ ॥ विराहित असावें मग तेणें बोलावें । ऐसें न दिसाव काय करूं ॥ ३ ॥ तुका विदेहात्मा केला या अनंतें । आपुल्या उचितें दयाळुवें ॥ ४ ॥

॥ ७३९४ ॥ तस्मात इंद्रियें जे कां दशविध । आहे तया बुध अधिकारी ॥ १ ॥ भरतर्षभा जय घेतां यापासुनी । कामाच्या भुवनीं अग्नि पेटे ॥ २ ॥ ज्ञान नाश पुढें विज्ञाना न ठेवी । तयास नुरवी तुका ह्मणे ॥ ३ ॥

॥ ७३९५ ॥ स्थूला पुढें करणें वागती हे पार्था । मन पैल पंथा तयाचीये ॥ १ ॥ मना पैलीकडे बुद्धिची तिकडे । आत्मा तो निवडे सा परता ॥ २ ॥ साक्षी होवोनीयां लिप्त नव्हे कर्मा । आतुलीया वर्मा रीझे वीरा ॥ ३ ॥ तुका ह्मणे देव कृपावंत खरा । वरी उजगरा दशा आली ॥ ४ ॥

॥ ७३९६ ॥ तिनें असे तीसी परता आपण । जाणे वरी खूण हेचि पार्था ॥ १ ॥ जाणोनी थांबवी तीसी मनापासी । शक्ति चैतन्यासी जंव मीळे ॥ २ ॥ परि सामर्थ्याची उठावणी करी । हा शत्रु संहारी कामरूप ॥ ३ ॥ महाबाहो नाम तरीं साच वाटे । अजिंक्य नीवटे तुका ह्मणे ॥ ४ ॥

## अध्याय चवथा.

॥ ७३९७ ॥ आनंदाचा कंद गोविंद बोलिला ॥ ऐके या गोष्टिला पूर्वींचीया ॥ १ ॥ पुरातन योग मीच आत्मज्ञा हें ॥ बोलिलों ज्ञान हें भानुदेवा ॥ २ ॥ सूर्य होतकार मनुसी सांगतू ॥ तोहि अनुग्रहितू इक्ष्वाकूसी ॥ ३ ॥ ऐसें हें पूर्वींचें आहे भांडवल ॥ सांपडे नवल तुकयासी ॥ ४ ॥

॥ ७३९८ ॥ परंपरागत ऐसाचि जाणीजे ॥ ऋषी देवराजे सुखावले ॥ १ ॥ योग तरी अचळ परि झाला चळ । बहुत युगमूळ जाणोनियां ॥ २ ॥ परंतपा अस्तमाना गेल्या रवी । प्रकाश नुरवी स्वल्पमात्र ॥ ३ ॥ तुका म्हणे भाग्य भासे सज्जनाचें । झाले प्रकाशाचें वांटेकार ॥ ४ ॥

॥ ७३९९ ॥ तोचि हा आजी म्यां तुज प्रगटिला । योग जो लोपला पूर्वीं होता ॥ १ ॥ तूं तंव माझा सखा भक्त हि वरिष्ठ । म्हणोनि उत्कृष्ट दया

आली ॥ २ ॥ न सांगें बंधूतें नारीसुताद्भुता । मातापिताचुलता वंचिले म्यां ॥ ३ ॥ अद्भुत रहस्य अप्राप्त सुरवरा । अतुडलें करा तुका म्हणे ॥ ४ ॥

॥ ७४०० ॥ पार्थ ह्मणे मातें विस्मय वाटतो । राग आपण तो धरूं नये ॥ १ ॥ आलीकडे जन्म तुझा पूतनारी । उत्पन्न द्वापारीं आम्ही झालों ॥ २ ॥ आद्य युगीं रवि त्यालागीं संवाद । वर्णीसी विषाद आह्मां पुढें ॥ ३ ॥ आतांचें नेणवे पूर्वीं जाणे कोण । अंगीं पावों खूण ऐसें करा ॥ ४ ॥ लोक संपादणी तूं तंव त्यापर । उघड विचार तुका म्हणे ॥ ५ ॥

॥ ७४०१ ॥ बोले नारायण ऐके कुरुनाथा । व्यर्थ नको पंथा संशयाचा ॥ १ ॥ क्रमिलीं बहु जन्में माझीं तुझीं तेंही । मी जाणतों पाहीं ईशपणें ॥ २ ॥ देही तूं अर्जुना नेणसी हें वर्म । तुका म्हणे धर्म हाचि मुख्य ॥ ३ ॥

॥ ७४०२ ॥ अज म्हणिजे नित्य अविनाश अक्षयीं । भाव शेषशायीं जाणवितो ॥ १ ॥ भूतें मजपासून कोणापासून मी । आणुनी मनोक्रमीं पाहें बरें ॥ २ ॥ होतों शुद्धबुद्ध आत्मैव मायेंत । आपुली आकृत अधिष्ठूनी ॥ ३ ॥ तुका म्हणे हरी सांगेल माहात्म । श्रोते हो उत्तम श्रवण कीजे ॥ ४ ॥

॥ ७४०३ ॥ जे जे वेळें धर्मु हानि पावे क्लेशें । दैत्य दुरा रोषें अधर्मांचेनी ॥ १ ॥ अधर्म उंचावे त्रैलोक्य जीणाया । तेव्हां आत्मकाया सृजीतों मी ॥ २ ॥ तुका म्हणे देव सांगतां ऐकावें । जेणें पराभवें संशय हा ॥ ३ ॥

॥ ७४०४ ॥ रक्षावया साधुजनां । मारावयासी दुर्जनां ॥ १ ॥ धर्म स्थापन करावया । होतों युगायुगीं कौंतेया ॥ २ ॥ हेंचि देहधारण मूळ । ऐके मम मायेचा खेळ ॥ ३ ॥ तुका ह्मणे अभयाचें । दानपात्र भाविकाचें ॥ ४ ॥

॥ ७४०५ ॥ माझी जन्म कर्म लीळा । जाणे भाविकु जो भोळा ॥ १ ॥ धन्य तोचि भूमिवरी । देहि असोनि निर्विकारी ॥ २ ॥ पद शाश्वत पावेल । अनुपम्य हें गाइल ॥ ३ ॥ खुंटे पुन्हां त्याचा जन्म ॥ अनुभवें म्हणे तुकाराम ॥ ४ ॥

॥ ७४०६ ॥ कामक्रोधभयाविण । तोच साधू पूर्ण जाण ॥ १ ॥ ध्याननिष्ठ मदाश्रित । त्यास आम्हीं म्हणों संत ॥ २ ॥ बहुत ज्ञान तपें शुद्ध ॥ जाणावा तो महा सिद्ध ॥ ३ ॥ जे पावले स्वस्वरूपीं । तुकया शरण त्या चिद्रुपीं ॥ ४ ॥

॥ ७४०७ ॥ जें जें जैसे मातें भजे । मीही तया तैसा उमजे ॥ १ ॥ जैसा भाव ठायीं माझे । फळे तेवीं त्यासहजें ॥२॥ पार्था मानव सकळ। मम मार्गीं च निखळ ॥ ३ ॥ वर्तताती हे तूं जाण । तुका वंदी साचे चरण ॥ ४ ॥

॥ ७४०८ ॥ अन्य देवता पूजिती । जे कां कर्मसिद्धी प्रती ॥ १ ॥ नाना विध मार्गांतरें । ध्यान उपास्य गजरें ॥ २ ॥ कर्म मूळेंच सां सिद्धी । नरलोकीं पैं त्रिशुद्धी ॥ ३ ॥ पावे शीघ्र भक्तिभावें । तुका ह्मणे पूर्व दैवें ॥ ४ ॥

॥ ७४०९ ॥ विप्र क्षत्रिय वैश्य शूद्र । वर्ण विभाग चत्वार ॥ १ ॥ केले इच्छेनी आपुले । मार्ग भिन्नत्वीं स्थापिले ॥ २ ॥ सांभाळितों पुनः पुन्हा । असोनि अलिप्त अर्जुना ॥ ३ ॥ अज अव्यय छंदानें । तुकया जाणतु संधानें ॥ ४ ॥

॥ ७४१० ॥ कर्में लिंपती नामातें । जरी माझिये साक्षीतें ॥ १ ॥ नवल सांगतों अर्जुना । ह्मणे संशयो हा मना ॥ २ ॥ कर्म सुफळ प्राप्ति आशा । नसे किंचित नरेशा ॥ ३ ॥ जाणे खूण तोचि मुक्त । होय तोचि कर्मातीत ॥ ४ ॥ बद्ध शुभाशुभीं नव्हे । तुका वर्णी सा गौरवें ॥ ५ ॥

॥ ७४११ ॥ ऐसें जाणूनि मुमुक्षीं । कर्में केलीं पूर्वपक्षीं ॥ १ ॥ कुरुवर्या सा आधारें । करी कर्म साचोकारें ॥ २ ॥ केलीं पूर्वज पूर्वजीं । तुका जयांसी नावाजी ॥ ३ ॥

॥ ७४१२ ॥ येथें मोहिलें ज्ञानियें । खुण नये ध्यानाशी ॥ १ ॥ कैसें कर्म अकर्म तें । संशयातें दर्शवी ॥ २ ॥ जाणून मी तूज सांगें । अशुभ अंगें सूटसी ॥ ३ ॥ तुका ह्मणे दिव्य मत । सावध चित्तें ऐकावें ॥ ४ ॥

॥ ७४१३ ॥ तत्व वेदोक्त कर्माचें । कर्म साचें अवधारी ॥ १ ॥ निषिद्ध विकर्मांचें जें । तेथें बुझें सर्वज्ञ ॥ २ ॥ अकर्मांचें ही जाणावें । जीवीं ध्यावें एकत्व ॥ ३ ॥ तुका वदे कर्मगती । गहन ह्मणती यास्तव ॥ ४ ॥

॥ ७४१४ ॥ न बाधे तें नव्हे कर्म ॥ मुख्य वर्म तें ऐसें ॥ १ ॥ अकर्मता कृष्णार्पणीं ॥ सत्य वाणी मानावी ॥ २ ॥ अकर्मींच कर्म पावे ॥ हें तों अवघें चोखट ॥ ३ ॥ तुका वदे सर्वकृत ॥ देखे मात सर्वज्ञ ॥ ४ ॥

॥ ७४१५ ॥ काम संकल्प त्यागुनि ॥ आत्मध्यानीं रतला ॥ १ ॥ सर्व कर्मा जो आरंभी ॥ निर्मळ नभीं चंद्रमा ॥ २ ॥ ज्ञानाग्निनें जाळी कर्मा ।

शिवशर्मा पैं जैसा ॥ ३ ॥ तोचि पंडित बोलती ॥ तुका स्तुति करी ज्याची ॥ ४ ॥

॥ ७४१६ ॥ सर्व टाकुनी फळाशा । स्वात्मतोषा भीतरीं ॥ १ ॥ निराश्रय सदा तृप्त । पारंगत सच्छास्त्रीं ॥ २ ॥ सर्व कर्मी प्रवर्तला । जैसा भला मिथिलेश ॥ ३ ॥ तरी कांहीं न तो करी । साक्षोत्तरीं तुकयाचे ॥ ४ ॥

॥ ७४१७ ॥ देहचित्त वश करुनी । जो साधनीं विनटला ॥ १ ॥ परिग्रह न ते आशा । मद ईर्ष्या नेणेची ॥ २ ॥ शरीर मात्रें जो कर्म । करी धर्म रक्षुनी ॥ ३ ॥ बंधनातें छेदून वर्त्ते । लाभसर ते तुकयासी ॥ ४ ॥

॥ ७४१८ ॥ लोभ सर्वांसी सारिखा । तुष्ट देखा अयाचितें ॥ १ ॥ सुख दुःख द्वंद्व नेणे । मत्सर नेणे भावेंची ॥ २ ॥ सिद्धी असिद्धींत सम । आत्माराम साधका ॥ ३ ॥ बद्ध नव्हे कर्म करितां । तुकया वार्ता निवेदी ॥ ४ ॥

॥ ७४१९ ॥ कर्तृत्वापासुनि मुक्त ॥ जो विरक्त सर्वदा ॥ १ ॥ थोर चित्त आत्मरूपीं ॥ कीं चिद्रूपीं खेळे तो ॥ २ ॥ मखार्थ कर्माचरे ॥ निर्व्यापारें आवडीं ॥ ३ ॥ सर्वेही तें जातें लया ॥ ठायीं जया तुकाराम ॥ ४ ॥

॥ ७४२० ॥ कर्ता अग्नि हविर्द्रव्यें ॥ जिवें भावें एकाग्र ॥ १ ॥ ब्रह्मींच अर्पून ॥ झाला लीन माझारी ॥ २ ॥ कर्मी ब्रह्म समाधिस्थ ॥ चिंताग्नींत सारिखा ॥ ३ ॥ त्याणें ब्रह्मींच पावणें ॥ सुख बाणे तुकयासी ॥ ४ ॥

॥ ७४२१ ॥ इंद्रादि भावेंचि यज्ञ । जो सर्वज्ञ स्वीकारी ॥ १ ॥ उपासिती कर्म योगी । पुढें भोगी निज मोक्षु ॥ २ ॥ जे कां ज्ञानी ब्रह्माग्नींत । मन चित्त सामग्री ॥ ३ ॥ यज्ञरीतींच होमिती । तयां प्राप्ती निजलाभु ॥ ४ ॥ तुका ह्मणे आणीकही । यज्ञ पाही सांगतु ॥ ५ ॥

॥ ७४२२ ॥ ज्ञानेंद्रिय कर्मेंद्रिय । दाहा करणांचा प्रत्यय ॥ एकवटी समुदाय । स्वात्मसत्तें याजकु ॥ १ ॥ पृथगाकारें निग्रह । सोडूनी दुराग्रह ॥ करूनी आत्म अनुग्रह । नियमाग्नीं होमिती ॥ २ ॥ त्या इंद्रियाग्नींत । सावधान याजक होत ॥ वर्ण अर्थ सारहुत । शब्दालागीं होमिती ॥ ३ ॥ तुका ह्मणे संतांप्रती । जैसी सारांश पद्धती । ऐसें निवेदी श्रीपती । पार्थाप्रती ऐकावें ॥ ४ ॥

॥ ७४२३ ॥ कोणी आईक अर्जुना । पाहे निगमभावना ॥ सर्व इंद्रियस्वाधीना । हेच इष्ट सामग्री ॥ १ ॥ पांच प्राण या देहांत । वाग-

ताती आत्मस्थित ॥ त्यांचि कर्मे यथास्थित । तीं चहुंकडे निर्मिलीं ॥ २ ॥ आतां वृत्तीनें निवृत्ती । पद पाउनि झाली तृप्ती ॥ तेथें चिद्भानूची दीप्ती । व्यापे पृथ्वी आकाश ॥ ३ ॥ तुका म्हणे तेच कळा । निरोधाग्नीची ज्वाळा ॥ होमिती घनसांवळा । आत्मतोंडें वर्णितु ॥ ४ ॥

॥ ७४२४ ॥ धनापासून अभिज्ञ । देवद्विज पितृयज्ञ ॥ होतोचि द्रव्य यज्ञ । पैं तत्वज्ञ जाणती ॥ १ ॥ तपोयज्ञ तापसांचा । योगयज्ञ तो योग्यांचा ॥ सुव्रत वेदार्थाचा । ज्ञानयज्ञही बोलती ॥ २ ॥ यत्नशीळ जे पांडवा । अनुष्ठिती स्वात्मदेवा ॥ तुका म्हणे हेंच देवा । झालें पूर्ण आवडतें ॥ ३ ॥

॥ ७४२५ ॥ अपान अधस्थ आसनें । साधुनि आधार अधिष्ठानें ॥ तेथें होमिजे प्राणें । आत्माहूति अपानीं ॥ १ ॥ मग ऊर्ध्व दशेची ते गती । स्वाधिष्ठानाचे वरती ॥ मणिपुरांत आहुती । अपान घेतु प्राणाची ॥ २ ॥ कोणी प्राण अपानास । निरोधोनि षट्चक्रांस ॥ जिणोनि प्राणायामास । उतावेळ झाले जे ॥ ३ ॥ तुका म्हणे साधक जनीं । योगमार्गा अनुभवुनी । पंथ ठेविला नित्यानी । वागावया पांथिका ॥ ४ ॥

॥ ७४२६ ॥ हळू योग वाटे वात । साधुनि आहार नियमित ॥ तेथें मन केवीं तृषित । पिडूं शकेल हें नेणें ॥ १ ॥ प्राणीं प्राणास होमिती । हटयोगी ऐसे रीतीं ॥ सर्व यज्ञें पावन होती । त्या बोलती यज्ञवित ॥ २ ॥ तुका म्हणे नारायणें । केलें पार्थासी सांगणें ॥ ना तें साधूचें मागणें । होतें कांहीं पूर्वीचें ॥ ३ ॥

॥ ७४२७ ॥ यज्ञशेष जें अमृत । देवादिक ज्या इच्छित ॥ त्याचे भोक्ते झाले संत । पूर्ण हट प्रयत्नें ॥ १ ॥ मग यांत लाभ काय । ऐसा कोणी पुसता होय ॥ तरी परब्रह्म ठाय । पैं पावती भरंवसे ॥ २ ॥ आतां आळसी पांडवा । नसे याजत्व स्वभावा ॥ त्यासी इहलोकीं बोलवा । मान कैसा परत्रीं ॥ ३ ॥ कुरुउत्तमा अर्जुना । चित्त द्यावें या वचना ॥ कांहीं असलया कल्पना । त्या तूं मातें निरूपी ॥ ४ ॥ तुका ह्मणे चोखट । जें ज्ञान यज्ञा वरिष्ठ ॥ तें सेविताति ब्रम्हानिष्ठ । सोहंमंत्रें करूनी ॥ ५ ॥

॥ ७४२८ ॥ बहु यज्ञाचा विस्तार । झाला विधिपासून साचार ॥ सर्वे ही कर्म सारासार । ऐसें जाणून सूटसी ॥ १ ॥ कर्मीं बद्धता पांडवा । ह्मणोनि जडपण ठेवा ॥ यांचे संगें जड जीवा । तरणोपाय काय-

सा ॥ २ ॥ ऐसें कल्पिसी मानसीं । ज्ञानीं आशंका विवसी ॥ हातीं नलगे ठेव्यासी । पैं गा भूतें झोंबल्या ॥ ३ ॥ तया भूताची झाडणी । करील येथें गदापाणी । पंचाक्षरी तो निर्वाणी । सोडविलें सोडवी ॥ ४ ॥ तुका ध्याय ध्याना जवळ । ज्याची अखंडित माळ ॥ ह्मणून संतांमाजी खेळ । झाला ब्रह्मप्राप्तीचा ॥ ५ ॥

॥ ७४२९ ॥ द्रव्य यज्ञाहून श्रेष्ठ । ज्ञानयज्ञ हा वरिष्ठ ॥ पार्था यातें ब्रह्मनिष्ठ । बहुधा ऐसें जाणती ॥ १ ॥ लौकिक वैदिक कर्मे ॥ सर्वहि तीं ज्ञानकर्मे ॥ पावे संपत्ती सप्रेमें । नोहे कदा दरिद्री ॥ २ ॥ हळहळ गेली ज्याची । तो संपत्तीवंत त्याची ॥ कीर्ति पाठ तुका वाची । लोकामाजी सर्वदा ॥ ३ ॥

॥ ७४३० ॥ तें ज्ञानप्राप्ति खुण । ऐके पांडवा लक्षण ॥ अर्थी सद्भावें नमन । मग प्रश्न आवडीचा ॥ १ ॥ सेवा भावार्थें करावी । निरपेक्षता असावी ॥ तेव्हां कृपा उपजे जीवीं । मग तो होय उपदेशु ॥ २ ॥ शास्त्रज्ञ तत्वज्ञ । ज्ञान सांगती सर्वज्ञ ॥ तेव्हां सहज वर्मज्ञ । तुका ह्मणे भाविकु ॥ ३ ॥

॥ ७४३१ ॥ जें ज्ञान जाणुनियां । पुन्हां ऐसा मायामया ॥ न मोहसील कौंतेया । दृश्य भास दिसेना ॥ १ ॥ स्थूळ सूक्ष्म जीं भूतें । अथवा स्थावर जंगमांतें ॥ आत्मरूप तूं तयांतें । आपणातें देखसी ॥ २ ॥ मग मजशीं ऐक्यता । होय कैसी ऐके आतां ॥ जैसें पावकें कवळीतां । दे ऐश्वर्य आपुलें ॥ ३ ॥ गंगासिंधु समागमीं । कीं भानुच्या ठायीं रश्मी ॥ तेवीं एक तेथें नामीं । तुका न वचे निराळा ॥ ४ ॥

॥ ७४३२ ॥ असलास जरी पापिया शरीरीं । नोहे कवणे परी उद्धारची ॥ १ ॥ थोर पापि भिती ऐसी जरी गती । झाली तुजप्रती पार्थवीरा ॥ २ ॥ तरी पापसिंधुवरि हे अगाधु । आहे कीं निर्बाधु ज्ञान नौका ॥ ३ ॥ तुका म्हणे सार निवडी रमावर । श्रवणेंचि उद्धार भाविकांचा ॥ ४ ॥

॥ ७४३३ ॥ किंवा जसा पेटे वन्हि जाळी काष्ठें । तेथें सानें मोठे न विचारीची ॥ १ ॥ तैसा एकवेळां ज्ञानाग्नी उजळला । झाल्या कर्मकळा भस्म करी ॥ २ ॥ तेथें पुण्यपाप नोळखे स्वरूप । उडवी संकल्प पतंग ते ॥ ३ ॥ तुका मुक्त झाला या मार्गें जो गेला । तोचि या जनाला उपदेशु ॥ ४ ॥

॥ ७४३४ ॥ ज्ञाना सम नसे प्रायश्चित दिसे । शुद्ध जें आपैसें देहा करी ॥ १ ॥ ऐसें न साधन देखती लोचन । सवर्गुणें मान ज्ञानासीच ॥ ॥ २ ॥ ज्ञात्याच्या प्रयत्नें लाभे योग चिन्हें । मग सिद्धि रत्न येती हाता ॥ ३ ॥ काळें वया चित्तांत अनुभव बिंबत । तुकयाचें हित येवढेंची ॥ ४ ॥

॥ ७४३५ ॥ श्रद्धाळू तो ज्ञान पावे हें तूं जाण । पूर्ण समाधान जयापासी ॥ १ ॥ जो कां इंद्रियांतें आणितू हारिलें । आणी ब्रह्मत्वातें तत्पर जो ॥ २ ॥ ज्ञानास पाऊनी शांतिस घेऊनी । बैसे निगमवनीं म्हणे तुका ॥ ३ ॥

॥ ७४३६ ॥ बुडे अज्ञ तैसी अश्रद्धा मानसीं । वसे जयापासी निरंतर ॥ १ ॥ हीन जो संशयीं बुद्धि तैसी नाहीं । सुखरूप पाहीं सर्वकाळ ॥ २ ॥ बुद्धि संशयाची नदों लोकीं रूची । फळश्रुती काची तुका ह्मणे ॥ ३ ॥

॥ ७४३७ ॥ कर्म योगांतरीं संन्यासाची थोरी । वंद्य द्विजवरीं अग्रपूजें ॥ १ ॥ मुक्त झाला देहीं नुरे संशय कांहीं । वेदशास्त्र ग्वाही पाहूनीयां ॥ २ ॥ जो कां आत्मवेत्ता तथा कर्मवार्त्ता । न बाधी ती चित्तामाजी घेई ॥ ३ ॥ तुका म्हणे मुक्त झाले देहातीत । अधम नेणत वायां गेले ॥ ४ ॥

॥ ७४३८ ॥ तस्मा त्तूं हा वैरी संशय संहारी । जो वागे अंतरीं अमंगळ ॥ १ ॥ छेदीं ज्ञानखड्गें शीर याचें वेगें ॥ स्वकर्म तूं अंगें अनुष्ठि पां ॥ २ ॥ तुका विनवणी ऐकावी सज्जनीं । समाप्त येथूनी प्रसंगू हा ॥ ३ ॥

---

## अध्याय पांचवा.

॥ ७४३९ ॥ पुसे पांडुपुत्र परिसे नीरदगात्र । संशयाचें क्षेत्र एक दिसे ॥ १ ॥ बोलोनियां कर्म संन्यासाचें वर्म । कर्मयोगोत्तम निवेदीसी ॥ २ ॥ परि यां दोहींत श्रेष्ठ दावी हित । मज सांग साद्यंत कृष्णनाथा ॥ ३ ॥ तुका म्हणे जगव्यापकाचा संग । तेथें ज्ञान मग काय ऊणें ॥ ४ ॥

॥ ७४४० ॥ बोले लक्ष्मीकांत विश्वाचा जो अंत ॥ कल्याणकरांत संन्यास हा ॥ १ ॥ कर्मयोग तैसा जाण तूं वीरेशा । थोर सांगोदेशा कर्माचीया ॥ २ ॥ कर्मयोग श्रेष्ठ बोलती परानिष्ठ । विचारेंचि जेष्ठ तुका म्हणे ॥ ३ ॥

॥ ७४४१ ॥ संन्यासी जाणावा येथें तो बरवा। नेणे द्वेषभाव कदा जगीं ॥ १ ॥ सुखें आढळतां नेणें सुखवितां। मूळ विरक्तता यतीश्वरा ॥ २ ॥ निर्द्वंद्व सर्वदा भोगीत आनंदा । अनायासें बंधा पासाव तो ॥ ३ ॥ सुटे हा संशय केवीं देतु न्याय। जेथें ऐक्यमय तुका झाला ॥ ४॥

॥ ७४४२ ॥ बोलती ते सांख्ययोगांसीं पंडीत । पृथक अज्ञानांत ज्यांची बुद्धि ॥ १ ॥ कीं हा एक दीसे अनुष्ठिल तया। फळ पावे द्वयामाजी एक ॥ २ ॥ आतां विचारांत बरी दृष्टि देयी । जेणें तुक्याठायीं विरामेला ॥ ३ ॥

॥ ७४४३ ॥ पावती ज्या स्थळा सांख्य अनुभूतीं। तेथेंच पावती योगीराज ॥ १ ॥ सांख्ययोगा ऐसें ऐक्य जो पाहिल । डोळस होईल पार्थिवा तो ॥ २ ॥ श्रीकृष्णवचन प्राण हा वेदाचा । तुका म्हणे साचा अनुभव ॥ ३ ॥

॥ ७४४४ ॥ नव्हे ऐसा तो संन्यास। दुर्लभ कर्मावीण वोस ॥ १ ॥ कर्मयोग आचरणीं। घेती स्वसुख निर्वाणीं ॥ २ ॥ पावे झडकरी परब्रह्म। ऐसा मार्ग हा सुगम ॥ ३ ॥ तुका ह्मणे आन एक। ऐका बुद्धीचे बोधक ॥४॥

॥ ७४४५ ॥ चित्तशुद्धि कर्मयोगें। कोणा पुसावें न लागे ॥ १ ॥ अहो जिंकुनियां मन। केलीं इंद्रियें स्वाधीन ॥ २ ॥ जीव भूतांचा जो देह नलगे किमपी संदेह ॥ ३ ॥ अलिप्त जो करितां ही। तुका ह्मणे तो वीदेही ॥ ४ ॥

॥७४४६ ॥ ऐसें कांहीं न करीतो। स्मृति साक्षीतें वर्ततो ॥ १ ॥ मानीतो नित्याचारी। तत्ववेत्ता ब्रह्मचारी ॥ २ ॥ विषयीं वर्ततां जातां। न सुटे समाधि तत्वतां ॥ ३ ॥ निद्रा घेतां श्वास सांडी ॥ तुका म्हणे सहज खोडी ॥ ४ ॥

॥ ७४४७ ॥ वाचा पाणि पाद लिंग । गुद पांच हे कर्मांग ॥ १ ॥ यांच्या आचरतां क्रिया । अंतर शुद्ध बाहेर माया ॥ २ ॥ निमिषादिक ही हालतां । छिन्न नव्हे संयोगता ॥ ३ ॥ इंद्रियें आत्मविषें । पैं वागतां तुका हर्षे ॥ ४ ॥

॥ ७४४८ ॥ कर्मं ब्रह्मीं अर्पून ॥ झालें मानस उन्मन ॥ १ ॥ करी सांडुनियां संगु । निरपेक्ष तोचि चांगु ॥ २ ॥ पापें न लिंपे तो जैसें। स्फटिक रंगाचे कडवसे ॥ ३ ॥ जळीं पत्र कमळिणीचें ॥ तुकयासि साम्य साचें ॥ ४ ॥

॥ ७४४९ ॥ काया मानस एकाग्र ॥ बुद्धि होऊं नेदी उग्र ॥ १ ॥ गेली वासना पळाली । करणें एका पंथीं आलीं ॥ २ ॥ मग वांछी चित्त-शुद्धी । करी निःसंगत्व सिद्धी ॥ ३ ॥ संग टाकुनियां क्रिया । स्वात्मप्राप्ती हे तुकया ॥ ४ ॥

॥ ७४५० ॥ योगी ऐशा चिन्हीं जाण । कर्मफळीं निराकरण ॥ १ ॥ आत्मस्थितीस पावला ।.सहज शांति आली त्याला ॥ २ ॥ सकामता लागे पाप । जेथें कामना संकल्प ॥ ३ ॥ बध्दफलाशें बांधतो ; तुका म्हणे वायां जातो ॥ ४ ॥

॥ ७४५१ ॥ करुनी निष्काम कर्मास । योगी संपादी संन्यास ॥ १ ॥ सुखी होऊनियां मनें । न करी क्षुद्रादि साधनें ॥ २ ॥ नव द्वारें पुरे देहीं । वस्ती संरक्षी विदेही ॥ ३ ॥ स्वयें न करी करवी हिना । तुका म्हणे इतर जनां ॥ ४ ॥

॥ ७४५२ ॥ कर्तृत्व कर्म लोकांचें । अथवा त्याच्या प्रपंचाचें ॥ १ ॥ ईश्वर निर्गुनि निराळा । कर्मसाक्षित्वें वेगळा ॥ २ ॥ न तो कर्मास करवी । अथवा फळश्रुति भोगावी ॥ ३ ॥ वर्ते संसाराचें चक्र । तुका सर्वदा अवक्र ॥ ४ ॥

॥ ७४५३ ॥ पाप हि नेघे तो कोणाचें । जेणें योगें पूर दुःखाचे ॥१॥ नेघे पुण्यही ईश्वर । पावावया स्वर्गद्वार ॥ २ ॥ आज्ञानानें जें वेष्टित । ज्ञानमोहें विष्कळित ॥ ३ ॥ यास्तव करिती भोगिती । तुका ह्मणे अहंमती ॥ ४ ॥

॥ ७४५४ ॥ आज्ञान निजबुद्धीचें । नासी ज्ञान जिव्हाळ्याचें ॥ १ ॥ परि ज्ञान शुद्ध चोखट । नाशि अज्ञानाचें दुःख ॥ २ ॥ पराजदाचे तें ज्यांचे । अंध नेत्र तिमिराचे ॥ ३ ॥ ज्ञानसूर्यउदयांत । तुका झाला स्वरूपवंत ॥ ४ ॥

॥ ७४५५ ॥ बुद्धि चित्त त्याचि ज्ञानीं । एकविध नियमुनी ॥ १ ॥ परमाश्रयें तेचि निष्ठा ॥ साजे सदा योगभ्रष्टा ॥ २ ॥ मोक्ष पावती ऐसे ते । विश्वंभरीं एकचित्तें ॥ २ ॥ तुका म्हणे दग्ध केलें । ज्ञानें संचित जाळिलें ॥ ४ ॥

॥ ७४५६ ॥ विद्या सद्गुण संपन्न । अयाचित लोकमान्य ॥ १ ॥ ब्राह्मणीं धेनुमध्यें । याति भेदादि संबंधें ॥ २ ॥ गजीं शुनीं तें चांडाळीं ।

सम पंडितु न्याहाळी ॥ ३ ॥ ज्ञान ज्याचें अखंडित । तुका ह्मणे तो पंडित ॥ ४ ॥

॥ ७४५७ ॥ सर्वभूतीं मन आपुलें । जेणें समान स्थापिलें. ॥ १ ॥ तेणें जीत असतां वीरा ॥ केला मातेरा भवाचा ॥ २ ॥ समब्रह्म तें निर्दोष । जें निःशेष निर्मळ ॥ ३ ॥ तस्माद्ब्रह्मीं न ते समी ॥ तुकया वर्मी मनराते ॥ ४ ॥

॥ ७४५८ ॥ न हर्षे प्रिय होतांना । ज्याच्या मना निश्चळता ॥ १ ॥ नोहे घावरा अप्रियें । ज्ञानराय ज्ञान्याचा ॥ २ ॥ न जो मूढ स्थिरबुद्धी । देहशुद्धीरहित ॥ ३ ॥ ब्रह्मीं स्थिर ब्रम्हवेत्ता । तुकया चित्ता मिळाला ॥ ४ ॥

॥ ७४५९ ॥ स्पृहा न बाह्य विषयीं । एके ठायीं एकला ॥ १ ॥ सुख पावतां स्वरूपीं । सहज पापीं त्यागिला ॥ २ ॥ युक्त चित्त ब्रम्हयोगीं । सुख भोगी अक्षया ॥३ ॥ तुका म्हणे या परतें । काय उरतें बोलाया ॥४ ॥

७४६० ॥ जो कां स्पर्शे भोग विषय । मोहो वाह्य धरूनी ॥ १ ॥ तें तंव कारण दुःखाचें । जेथें वेचें आयुष्य ॥ २ ॥ आद्यंतवंत पार्था । हे अवस्था भूमीची ॥ ३ ॥ रमे ज्ञानी न त्या । सुखीं । तुका दुःखी प्रपंची ॥ ४ ॥

॥ ७४६१ ॥ जो जितांचि अर्जुना । सोसूं भावना शकेल ॥ १ ॥ पूर्वीच मरणाहूनी । न्याहाळूनी उपेक्षी ॥ २ ॥ काम वेग क्रोधोद्भव । स्वानुभव रक्षकु ॥ ३ ॥ नर तो सुखीं तोचि योगी । पांडुरंगीं तुकयातो ॥ ४ ॥

॥ ७४६२ ॥ अंतरसुखी अंतरिं रमे ॥ उंच प्रेमें निर्मळु ॥ १ ॥ अंतर्ज्योतींत जो स्वतां । निर्मुक्तता प्रपंची ॥ २ ॥ योगी ब्रह्मचि तो झाला । सांग साला उणीव ॥ ३ ॥ पावे निर्वाण पदा । तुकया सदा हरिकृपें ॥ ४ ॥

॥ ७४६३ ॥ लाभे ब्रह्मरूपता देहीं । निःसंदेही आकल्प ॥ १ ॥ क्षीणपातक जे ज्ञानी ॥ जगीं वस्तुनी अलिप्त ॥ २ ॥ स्थिर मति नासे द्वैत । यातायात नोळखे ॥ ३ ॥ सर्व भूतहितींरत । पाहाती संत तुकयासी ॥ ४ ॥

॥ ७४६४ ॥ कामक्रोधाविरहित ॥ झाला संत तो एक ॥ १ ॥ जेणें प्रयत्न केला बहु । मनवाहु कवाळिला ॥ २ ॥ देह मग मरो वांचो । अथवासाचो संपत्ती ॥ ३ ॥ केवळ मुक्त आत्मविद । तुकया पद वंदितु ॥ ४ ॥